१०३ शतकोत्तर वाटचाल

R.N.I.No.1814/57

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• मुंबई, गुरुवार १० जुलै, २०२५ • वर्ष-१०३, अंक-१२६, पाने-८, किंमत : ₹ ५ NAVAKAL

• Vol.- 103, Issue - 126, Marathi - Daily - Mumbai, 10 July, 2025 Page- 8 Price- Rs. 5/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

**पत्रकारितेतील महामेरू गुरुंना वंदन**



नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर



आप्पासाहेब उर्फ यशवंत खाडिलकर



अग्रलेखांचे बादशहा नीलकंठ खाडिलकर

# महाराष्ट्रावर सतत टीका करतात आता बडोद्यात पूल कोसळला! ११ ठार

**गुजरातमधील बडोदा आणि आणंद जिल्ह्यांना जोडणारा महिसागर नदीवरील ९०० मीटर लांबीच्या गांभिरा पुलाचा मधला भाग आज कोसळला. या दुर्घटनेत अनेक वाहने पुलावरून कोसळून ११ जणांचा मृत्यू झाला, तर ५ जण जखमी झाले. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली. या पुलाच्या दुरवस्थेची अनेक वेळा तक्रार केली होती. मात्र प्रशासनाने दुर्लक्ष केले, असा आरोप स्थानिक नागरिक आणि विरोधकांनी केला. विशेष म्हणजे, गुजरात आणि महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांच्या विकासाची नेहमी तुलना केली जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या गुजरातच्या विकासाला राष्ट्रीय पातळीवर आदर्श म्हणून प्रसिद्धी दिली जाते. मात्र, आजच्या पूल अपघातामुळे गुजरात मॉडेलवर टीका होत आहे.**

■ बडोदा

**आज** सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास ४० वर्षे जुन्या ९०० मीटर लांबीच्या गांभिरा पुलाच्या मधोमध असलेला १० ते १५ मीटरचा स्लॅब अचानक कोसळला. यावेळी पुलावरून जात असलेले २ ट्रक, २ व्हॅन आणि एक चारचाकीही नदीत कोसळली. तर एक



टँकर पुलावरून पडता पडता थोडक्यात वाचला. तो कललेल्या अवस्थेत अर्धवट तुटलेल्या पुलावर लटकत राहिला. स्थानिकांनी सांगितले की, पूल कोसळताना मोठा आवाज झाला. काही क्षणांतच पुलाचा भाग खाली कोसळला. बडोदा अग्निशमन दल, पोलीस, प्रशासन, बचाव पथकाच्या मदतीने तत्काळ बचावकार्य केले. क्रेन व बोटींनी नदीत अडकलेली वाहने बाहेर काढण्यात आली. मात्र, दुर्घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला, तर ५ जण जखमी झाले. वडोदऱ्याचे पोलीस अधीक्षक रोहन आनंद म्हणाले की, पूल पडल्याची माहिती मिळताच आम्ही लगेच घटनास्थळी पोहोचून बचावकार्याला सुरुवात केली. एकूण » पान ७ वर

# शिक्षकांच्या आंदोलनाचा अखेर विजय शरद पवार-ठाकरेंची प्रथमच उपस्थिती



**राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी शिक्षकांचे मुंबईच्या आझाद मैदानात आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला विविध राजकीय पक्षांचे नेते भेट देत आहेत. या आंदोलनाला ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही उपस्थिती दर्शवली. या शिक्षकांच्या अनेक वर्षे सुरू असलेल्या आंदोलनाला ते प्रथमच उपस्थित राहिले. त्यानंतर शिक्षकांच्या शिष्टमंडळाने संध्याकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीनंतर मंत्री गिरीश महाजन यांनी उपोषणस्थळी जाऊन घोषणा केली की, शिक्षकांचा वाढीव टप्प्याचा पगार १८ जुलैला त्यांच्या खात्यात जमा होईल.**

### अनेक वर्षांनी शरद पवार मैदानात

२५ जानेवारी २०२१ रोजी शेतकऱ्यांच्या मोर्चासाठी शरद पवार आझाद मैदानात आले होते. त्यानंतर मागील तीन वर्षे शरद पवार कधीच आझाद मैदानात आले नाही. त्यामुळे ते आज आंदोलकांसमोर आले याचे आश्चर्य व्यक्त होत आहे. शिक्षकांचे आंदोलनही गेली अनेक वर्ष सुरु आहे. राष्ट्रवादी आणि काँग्रेसचे सरकार होते, तेव्हाही हेच आंदोलन सुरू होते. उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी, काँग्रेसच्या मविआ सरकार काळातही याच मागण्यांसाठी आंदोलने झाली होती. त्या काळात शरद पवार कधीही शिक्षकांना पाठिंबा देण्यासाठी जाहीरपणे पुढे आले नाहीत.

■ मुंबई

**गिरिश** महाजन म्हणाले की, शिक्षकांचा संताप स्वाभाविक आहे. मी काल रात्री या ठिकाणी येऊन त्यांची भेट घेतली. त्यांना सांगितले की, आमची भूमिका सकारात्मक आहे. आतापर्यंत तुम्हाला दुसरे कोणी विचारले होते का? जे कोणी कालपासून रडताहेत, त्याचेही सरकार होते, तेव्हा त्यांनी तुम्हाला दालनात प्रवेशही दिला नाही. असे चालणार नाही. » पान ७ वर



# केंद्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणांविरोधात देशव्यापी बंद

■ नवी दिल्ली

**कामगार** संघटनांनी केंद्र सरकारच्या चार नव्या श्रम कायद्यांच्या विरोधात आज देशव्यापी भारत बंद पुकारला. या आंदोलनात देशभरातील दहा प्रमुख कामगार संघटना सहभागी झाल्या होत्या. नव्या श्रम कायद्यांमुळे संप करणे कठीण होईल. तसेच कामाचे तास वाढवण्यात आले आहेत. तसेच नोकरीची सुरक्षा, वेतन आणि सामाजिक सुरक्षा धोक्यात आली आहे. कंपनी मालकांना शिक्षेपासून संरक्षण देणाऱ्या या कायद्यांमुळे कामगारांचे हक्क डावलले जात असल्याचा संघटनांचा आरोप आहे. त्यामुळे कंत्राटी पद्धतीचा अंत, सार्वजनिक क्षेत्राच्या

### खासगीकरण विरोधात कामगारांच्या घोषणा

खासगीकरणाला विरोध, आणि किमान वेतन २६,००० रुपये करण्याच्या मागणीसह १७ कलमी मागण्यांसाठी कामगार संघटनांनी केंद्र सरकार विरोधात संप पुकारला.

ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस, एनएमडीसी, खनिज व पोलाद कंपन्यांचे कर्मचारी, बँका, विमा कंपन्या, राज्य सरकारी विभाग आणि सार्वजनिक उपक्रमांतील कर्मचारी मोठ्या प्रमाणात संपात सहभागी झाले. संयुक्त किसान मोर्चा आणि कृषी कामगार संघटनांनीही संपाला पाठिंबा दिला. भारत बंदचा सर्वात जास्त परिणाम पश्चिम बंगालमध्ये दिसला. कोलकातामध्ये कामगारांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. काही ठिकाणी जाळपोळ » पान ७ वर

# तुकडेबंदी कायदा रद्द मंत्री बावनकुळेंची घोषणा

■ मुंबई

**राज्यातील** शेतजमिनीवरील तुकडेबंदी कायदा रद्द करण्यात आला असून, यामुळे लहान भूखंडांचे व्यवहार कायदेशीररित्या करता येणार आहेत, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केली. १ जानेवारी २०२५ पर्यंत झालेले जमिनीचे तुकडे आता कायदेशीर मानले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. या निर्णयाचे महाविकास आघाडीनेही स्वागत केले.

सरकारने १२ जुलै २०२१ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार, शेतजमिनीची विक्री करताना जिरायतसाठी किमान २० गुंठे आणि बागायतीसाठी किमान » पान ७ वर

# राजस्थानमध्ये भारतीय हवाई दलाचे लढाऊ विमान कोसळले

■ रायपूर

**राजस्थानमधील** रतनगढच्या भानुदा गावाजवळ आज दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास भारतीय हवाई दलाचे लढाऊ विमान कोसळले. या दुर्घटनेत दोन्ही वैमानिकांचा मृत्यू झाला.

### दोन वैमानिकांचा मृत्यू

विमान कोसळल्यानंतर मोठा स्फोट झाला आणि परिसरात धुराचे लोट पसरले. गावानजीकच्या शेतामध्ये हे विमान कोसळून विमानाचा भडका उडाला. गावकऱ्यांनी घटनास्थळी जाऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघात झाला तेव्हा स्फोटाचा मोठा आवाज आला आणि क्षणात आगीचे लोळ उठले. घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी अभिषेक सुराणा, पोलीस अधिकारी आणि हवाई दलाचे बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. संपूर्ण परिसर पोलिसांनी सील केला.

# पार्ले जैन मंदिर पाडकाम ट्रस्टची याचिका फेटाळली

■ मुंबई

**विलेपार्ले** येथील जैन मंदिराचे अनधिकृत बांधकाम पाडण्यासंदर्भात शहर व दिवाणी न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणारी जैन मंदिर ट्रस्टची याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली. त्यामुळे या मंदिराचा अनधिकृत भाग पाडण्याचा मार्ग मोकळा झाला असला तरी उच्च न्यायालयाने मंदिरासंदर्भातील जैसे थे स्थितीला ४ आठवड्यांची मुदतवाढ दिली. न्यायालयाच्या न्या. गौरी गोडसे यांच्यासमोर ही सुनावणी झाली. श्री १००८ दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट व इतरांनी आपल्या याचिकेत म्हटले की, शहर दिवाणी न्यायालय किंवा महापालिकेचे आदेश चुकीचे नाहीत. मात्र बांधकाम तोडल्यानंतर या ठिकाणी केवळ एक भिंतच उभी आहे. उच्च न्यायालयाने मंदिर ट्रस्टची बाजू ऐकून घेतल्यानंतर जैसे थे स्थिती ठेवण्याला ४ आठवड्यांची मुदतवाढ दिली.

# लेहमध्ये दरड कोसळली! महाडचे पर्यटक अडकले

■ लेह

**लेह-मनाली** राष्ट्रीय महामार्गावर दरड कोसळल्यामुळे वाहतूक पूर्णतः ठप्प झाली आहे. यामुळे महाडमधील तीन कुटुंबांतील ९ पर्यटक मागील दोन दिवसांपासून रस्त्यात अडकले आहेत. उणे २ अंश सेल्सिअस तापमानात अन्न, पाणी व निवाऱ्याविना त्यांची स्थिती अत्यंत बिकट झाली आहे. अडकलेल्या पर्यटकांनी प्रशासनाकडे तातडीने मदतीसाठी कळकळीची मागणी केली आहे.

अडकलेल्या पर्यटकांमध्ये महाड येथील अमोल महामुणकर, समीर सावंत, राजेंद्र दरेकर आणि त्यांचे कुटुंबीय यांचा समावेश आहे. पर्यटनासाठी लेहला गेले असताना परतीच्या प्रवासात दरड कोसळल्याने हे सर्वजण महामार्गावरच अडकले. सोबत लहान मुले आणि महिला असल्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. याबाबत अमोल महामुणकर म्हणाले की, येथील हवामान अत्यंत थंड आहे. तापमान उणे २ अंशांवर गेले आहे. आमच्याकडे अन्न, पाणी, औषधे, गरम कपड्यांचा पूर्णतः अभाव आहे. दोन दिवसांपासून आम्ही या बिकट अवस्थेत आहोत.

लेह-मनाली महामार्गावर सतत दरडी कोसळत असल्याने बचावकार्यात अडचणी येत आहेत. खराब हवामानामुळे मदतीच्या प्रयत्नांना मर्यादा येत आहेत. दरड हटवण्याचे काम सुरू असले तरी रस्ता नेमका कधी खुला होईल याबाबत प्रशासनाकडून निश्चित माहिती मिळालेली नाही. या घटनेमुळे महाडमधील अडकलेल्या पर्यटकांच्या नातेवाईकांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे. प्रशासनाने तातडीने मदत पोहोचवावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# त्यांच्याकडे इतके पैसे कुठून आणता? खा.दुबेंचा ठाकरे बंधूंवर निशाणा

■ नवी दिल्ली

**झारखंडमधील** गोड्डाचे भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी पुन्हा उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरेंवर निशाणा साधला आहे. त्यांनी एक्स पोस्ट करत उबाठाच्या एका नेत्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले आणि राज ठाकरे यांच्यावर आरोप केला आहे. मुंबई आणि उपनगरांमध्ये खरेदी केलेल्या मालमत्तांची यादी शेअर करताना, त्यांच्याकडे इतके पैसे कुठून येतात? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. त्याचबरोबर २००७ च्या विकिलिक्सच्या अहवालाचा



हवाला देत राज ठाकरेंवर निशाणा साधला आहे.

दुबेंनी उद्धव ठाकरेंच्या नेत्याच्या भ्रष्टाचाराची कहाणी असे म्हणत एक पोस्ट केली आहे. त्यात त्यांनी एका उबाठा नेत्याचे मुंबईतील विविध ठिकाणचे फ्लॅट आणि कोकणातील मालमत्तांची यादी जाहीर केली आहे. ते म्हणाले की, न्यू मोर

### मालमत्तांची यादी जाहीर

सांताक्रुझमध्ये ३ बीएचके फ्लॅट, बांद्रामध्ये ४ बीएचके फ्लॅट, नालासोपारातील रचना रामेश्वर, समृध्दी मातृभक्तीमध्ये फ्लॅट, विरारमधील एअर इंडियाच्या कॉलनीत त्यांचा फ्लॅट आहे. » पान ७ वर

# ऋषि सुनक पुन्हा गोल्डमॅन सॅक्समध्ये

■ लंडन

**ब्रिटनचे** माजी पंतप्रधान ऋषि सुनक पुन्हा एकदा गोल्डमॅन सॅक्स या वित्तीय क्षेत्रातील दिग्गज बँकेमध्ये परतले आहेत. गोल्डमॅन सॅक्सने याची अधिकृत घोषणा केली आहे.

सुनक यांची भूमिका सल्लागाराची असणार आहे. सुनक यांच्या स्वागतासाठी मी अत्यंत आतूर झालो आहे. त्यांचा वित्तक्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आणि त्यांचे प्रगाढ ज्ञान याचा उपयोग आमच्या जगभरातील ग्राहकांना नक्कीच होईल, असा मला विश्वास आहे, असे गोल्डमॅन सॅक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी डेव्हिड सॉलोमन यांनी सांगितले.



# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

इंग्लिश ट्युशन टीचर 10 साठी,, रिसेप्शनीष्ट./ सेक्युरिटी /हाऊस किपींग. - 103, .निर्मलाधाम सोसायटी, प्रभातनगर, गांवदेवी मैदान, ठाणे स्टेशन वेस्ट, - **7304179292** {NC251403}

स्त्री पुरुष केअर टेकर पाहिजेत घरकुल केअर सेंटर : **9819426634/9969529162** {NC251451}

मालाड वेस्टमधील हेअरपिन कंपनीला पॅकींग कामासाठी मुली पाहिजेत. **8291702288/ 8879300487** {NC251458}

लॉजिस्टीक कंपनीला पाहिजेत १) नाईट/डे ऑपरेशन स्टाफ २) नाईट डाटाएन्ट्री ऑपरेटर ३) डे इडीपी स्टाफ ४) अकाऊंटंट ५) कस्टमर केअर एक्झिक्युटिव्ह ६) पिकअप डिलीव्हरीबॉईज ७) टाटाएस ड्रायव्हर. संपर्क करा- Unique Air Freight, 41, 42, आदर्श इंडस्ट्रीयल इस्टेट, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई 400099 मोबाईल- **9821060691** {NC251452}

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (22,000-75,000) **9820628009/ 9833470199** {NC251453}

SBI बँकेत ऑफिस कामासाठी लोकांची भर्ती 15,000/- ते 35,000/- **9702279241** {NC251382}

मुलुंड पश्चिम येथे बँकसाठी फील्ड कलेक्शन/टेलिकॉलिंग स्टाफ हवा आहे, पगार- १२,०००/- ते १८,०००/- (अनुभवानुसार) संपर्क:- **7021506468** {NC251457}

8/10/24 तास बेबीकेअरसाठी अनुभवी बाई / मुली पाहिजेत. **7977530720 / 9136383011** {NC251496}

मुंबई फोर्ट, परेल, चकाला, बोरिवली, मुलुंड येथे ड्रायव्हर पाहिजेत. पगार 16,000/- संपर्क - **8655344090 / 8169219424** {NC251459}

अंधेरी पूर्वमध्ये नाईट शिफ्टसाठी हेल्पर्स पुरवणारे मॅन सप्लायर (कॉन्ट्रॅक्टर) पाहिजेत. संपर्क - **9619291288** {NC251460}

## पाहिजेत

आश्रममध्ये 24 तासासाठी वॉर्डबॉय, आयाबाई हवी ठिकाण डोंबिवली **8379998437** {NC251463}

आश्रममध्ये कामासाठी पुरुष/महिला पाहिजेत. राहणे-खाणे फ्री, पगार 8000-10000. मीरारोड / पनवेल - **8779694066** {NC250851}

कुर्ला येथे झाडांच्या नर्सरीमध्ये हेल्पर पाहिजे. पगार 20000. फोन - **9029985564** {NC251375}

ऑफिस कामासाठी हेल्पर मुले पाहीजेत पत्ता : काळबादेवी मुंबई - 02, पगार - 13000/- मो. : **9022956660** {NC251515}

ठाण्यातील प्रा. लि. कंपनीला विविध पदांसाठी दहावी, बारावी, पदवीधर पास/नापास 30 मुले/मुली कायमस्वरुपी पाहिजेत. (फ्रेशर्सना प्राधान्य) प्लेसमेंट नाही. पगार 15000 - 45000/- **9819778053 / 7021534944** {NC251514}

फॅक्टरीमध्ये कामासाठी हेल्पर पाहिजेत. दीपक हार्डवेअर मार्ट. लोअर परेल. 9 ते 6 संपर्क - **7021428720** {NC251513}

झेरॉक्स दुकानामध्ये झेरॉक्स ऑपरेटर आणि डीटीपी ऑपरेटर पाहिजे. **8879348095, 9664984060** {NC250042}

## Situation Vacant

Need female computer tally operator at Andheri East call **9223314968** {NC251454}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC251417}

## व्यवसायविषयक

शाळांना लागणारी स्टेशनरी बनवणाऱ्या नामवंत मॅन्युफॅक्चरींग कंपनीला मुंबई/ नवीमुंबई/ ठाणे/रायगड/ पालघर जिल्ह्यात कमिशन वरती काम करणारे विश्वासू पुरुष/ महिला पाहिजेत. ज्या ठिकाणी राहता त्याच विभागात काम करून महिन्याला लाखो रुपये कमवण्याची सुवर्णसंधी अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटा: **8693009342/ 9082787983** {NC251443}

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा- दादर- **8652643434 / 9967437950** {NC251418}

## वर पाहिजे

सुंदर वधु-31, 5.3, 12वी, लहान मुलांचे क्लासेस घेते. 15000/- घटस्फोटित, विधुर चालेल, जातीची अट नाही. निर्व्यसनी, समजुतदार हवाय. त्वरित विवाह. **8983174198** {NC251489}

## वधू वर मेळावा

ब्राह्मण वधू वर मेळावा रजि.1600 कल्याण हॉल 11 जुलै **9819501294** विशाखा {NC251461}

## व्यसन मुक्ती

दारू सोडवा दारू, तंबाखू, गुटखा सिगारेट औषधे उपलब्ध. डॉ नागरगोजे **9765609769** {NC251356}


# ऑगस्ट महिन्यात काँग्रेसचे एकदिवसीय अधिवेशन

■ **लोणावळा** - काँग्रेस पक्षाच्यावतीने ऑगस्ट महिन्यात लोणावळा येथे एकदिवसीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. पक्ष संघटनेत एकजूट निर्माण करणे, नेतृत्व आणि कार्यपद्धतीत आवश्यक बदल करणे यावर विचारमंथन करण्याच्या उद्देशाने हे अधिवेशन महत्त्वाचे मानले जात आहे. या अधिवेशनात पक्षांतर्गत आमदारांची नाराजी दूर करण्यासाठी थेट संवाद साधण्यात येणार आहे. पक्षातील सदस्यांचे म्हणणे ऐकून घेऊन संघटनात्मक पातळीवर निर्णय घेण्याची तयारी पक्षाने दर्शवली आहे. त्याचबरोबर आगामी महापालिका निवडणुकांसाठी रणनीती आखली जाणार आहे.

# जपा 'जगण्यातली' गंमत



**सतत स्वतःला नवनव्या डेडलाईन देत राहिल्याने प्रगती होते, तुम्ही कामात राहता, पण मग मनस्वाथ्याचं काय? त्याचाही विचार करणे सध्याच्या व्यग्र दिनचर्येत आवश्यक झालंय. तो करा. नाहीतर मग आयुष्य एखाद्या रहाटगाडग्यासारखं सतत फिरत राहील. तुम्ही चालत राहाल, पण कधीतरी स्वतःकडे नीट निरखून पहाल तेव्हा वाटेल..'जगायचे राहूनच गेले!'.**



■ **सुजाता पेंडसे**

लेखिका-कवयित्री

आजकाल सर्वत्र आपल्या आजूबाजूची माणसं सतत कुठे ना कुठे जात असलेली दिसतात. अर्थातच काय, व्यवसाय आणि गरजांची पूर्तता करण्यासाठीची प्रत्येकाची धडपड असते. अन्न, वस्त्र, निवारा या तीनच गरजा भागवण्याकरिता प्रचंड खटपट करावी लागते. घरातले शक्य तितके सदस्य काही ना काही कमवण्याचा प्रयत्न करत असतात. कारण पुन्हा तेच. पैसा मिळवणे. या सगळ्या धावपळीत माणूस काहीवेळा इतका गुंतून जातो की तारुण्याची महत्त्वाची पंधरा-वीस वर्षे यात कधी मागे पडून जातात काही समजत नाही. स्वतःकडे देखील बघायला सवड मिळालेली नसते. आपल्यापैकी अनेकांचे असेच होताना दिसते.

नुकतेच एका मैत्रिणीकडे व्हॉट्सअॅप ग्रुपमधल्या इतर सगळ्या जणी जमलो होतो. तिथे जमलेल्या जवळ जवळ सर्वजणी काही ना काही काम करणाऱ्या, अर्थात अर्थार्जन करणाऱ्या होत्या. त्या ग्रुपमध्ये एक विषय देऊन काही ना काही मत व्यक्त करायचे, त्याबद्दल चर्चा करायची अशी आम्ही सवय लावून घेतली होती. त्यादिवशी बोलायचा विषय होता, बकेट लिस्ट. प्रत्येकीला सांगितलं होतं की, तिच्या बकेटलिस्टमधल्या गोष्टी सांगायच्या. प्रत्येकीनं त्यांच्या राहून गेलेल्या गोष्टी किंवा करायची इच्छा असलेल्या गोष्टी बोलून दाखवली.

या सर्वांचा विचार केल्यावर एक लक्षात आलं की 'किती साध्या साध्या इच्छा आहेत सगळ्यांच्या.' एकीला खूप वेळ पुस्तके वाचायला हवा होता. दुसरीला भरपूर फिरायचं होतं. अगदी फॉरेनलाच जावं, असं नाही, पण एखाद्या ठिकाणी निसर्गरम्य वातावरणात शांतपणे जाऊन काही दिवस राहायचं होतं. एकीला वृद्धाकामातल्या लोकांसाठी तिथे जाऊन काही काम करायचं होतं. एकीची पी.एच.डी राहून गेली होती. एक ना दोन अशा गोष्टी समोर आल्या की हे सगळं एकविसाव्या शतकातील स्त्रीच्या बकेट लिस्टमध्ये आहे? असं वाटावं. एकीला तर नवऱ्याचा क्वालिटी टाईम हवा होता. तिचा नवरा १४-१५ तास काम करून इतका कंटाळून गेला होता की, घरच्या कोणत्याही कामात त्याची साधी दखलही घेतली जात नव्हती. तिला एकटीलाच सगळं मॅनेज करावं लागत होतं.

एकूणच या सगळ्या चर्चा झाल्यावर मग एकीने त्यावर आपणच काहीतरी तोडगा काढायचं ठरवलं. कारण प्रत्येकजण धावपळ करत होती, तरीही स्वस्थता, समाधान कुणालाच नवं काहीतरी कमी आहे ही भावना कमी अधिक प्रमाणात सर्वांची होती. आयुष्य ट्रेडमिलवर धावत राहण्याइतकंच राहिलं होतं, म्हणजे सतत धावत राहणंच करतोय आपण असं वाटत होतं. त्यामुळे सर्वकाही असूनही नसण्याची भावना मनात येत होती.

अशीच भावना आजच्या युगात अनेकांच्या मनात नक्कीच दिसून येईल. स्वतःलाच जर प्रत्येकाने प्रश्न विचारला की, असंच आयुष्य मला हवं होतं का? तर या प्रश्नावर प्रत्येकजण 'नाही अजून थोडं वेगळं हवं होतं!' म्हणत काही ना काही बदल अपेक्षित आहेत असं सांगेल. कारण तुमच्या प्रत्येकाकडे अजून काही चांगलं.. वेगळं करण्याची क्षमता नक्कीच आहे. फक्त रूटीन सांभाळत राहणं एवढंच करतो आहोत, हे जाणवलं की तुमचं मन उदास होतं. निराश वाटतं.

खरंतर रूटीन सांभाळण्यात त्या धावपळीतही एक प्रकारचा तणाव असतो. तो दररोज जाणवतही असतो. पण मागे बघायला, थांबून थोडा विचार करायची सवड नसते आणि एनर्जीही नसते. म्हणजे शारीरिक, मानसिक ऊर्जा वापरली जातेय, पण ती आनंद देत नाही. उलट दिवसेंदिवस अधिक थकवते आहे. असं वाटतंय की आपण धावतोय पुष्कळ, पण कुठेच पोचत नाही आहोत.

अशी तुमची अवस्था झालीय का हे ओळखायचं असेल तर स्वतःला काही प्रश्न विचारा.

तुम्ही मोठी स्वप्नं बघायला घाबरता आहात का? याचं उत्तर 'होय!' असं आलं तर लक्षात घ्या की तुम्हाला वाटतंय, माझा घरखर्च, कुटुंब, जबाबदाऱ्या यांसह अनेक गोष्टी आहेत, ज्या मला वेगळं काही करायची परवानगी देत नाहीत. कारण तुम्हाला भीती आहे की वेगळं काही करायला गेली आणि फसली तर जबाबदाऱ्यांचं काय करायचं? असं वाटेल तेव्हा मनाला विचारा की अगदी मनापासून करायचंय असं काय आहे? त्यातून आपलं घरही सुरक्षित राहील आणि आनंदही मिळेल अशा गोष्टींसाठी छोटे छोटे प्रयत्न सुरू करा. तशी इच्छा बाळगा. काही वेळा याच प्रयत्नातून एखादं छानसं स्वप्न पुरं होण्याचा मार्ग आपोआप समोर येईल. भविष्याची भीती वाटून सुरक्षित खेळण्याची सवय लागली तर जगण्यातली गंमत संपून जाते.

आपल्या मनासारखं काही करण्यासाठी धाडकन हातातलं सगळं सोडून टाकून चालू लागा, असा याचा अर्थ नव्हे, पण आनंदाकडे जायचा रस्ता कोणता आहे आणि तिथे जायचे मार्ग कोणते आहेत, हे शोधून टप्प्याटप्प्याने तिकडे जाण्याचे प्रयत्न करणं शक्य आहे.

दररोजच्या व्यापातही तुम्ही बरेचदा खूप चांगलं असं, प्रशंसनीय काम करत असता, तुम्ही उत्तम काम केलंय हे ठाऊकही असतं, पण त्याबद्दलची शाबासकी दुसऱ्याकडून अपेक्षित असेल तर असे करू नका. जेव्हा उत्तम काम कराल, तेव्हा थोडंसं थांबून स्वतःचं कौतुक करण्याचं विसरू नका. तुमचा बॉस, घरची माणसं, मित्र यातलं कुणी कौतुक करेल, म्हणून वाट बघत बसू नका. स्वतःला चांगले मार्क्स तेही वेळोवेळी देत राहा. यामुळे आत्मविश्वास वाढतो.

स्वतःच्या आनंदासाठी काय करता येईल याचा विचारही कधी कधी नक्की करा. धावपळीच्या दिनचर्येत छोटे छोटे आनंद घ्यायचे विसरू नका. एखाद्या मित्रासमवेत एक कप चहा घ्यावासा वाटेल, एखादे नाटक बघावेसे वाटेल, कधी कधी आपलाही एखादा ब्लॉग सुरू करावासा वाटेल, कधीतरी काहीही न करता अगदी शांत, निष्क्रीय बसून राहावंसं वाटेल, तर तेही निवांतपणे करा. 'असा मी टाईम' शोधून काढा, ज्यातून मनाला काही क्षण तरतरी येईल.

तुम्ही जे काम करता आहात, त्यात जेव्हा जेव्हा छोटे का असेना यश मिळेल तेव्हा ते साजरे करा, आनंद व्यक्त करा. म्हणजे अगदी पार्टी करा. भरपूर खर्च करा असे नव्हे, पण ज्याने तुम्हाला आनंद, समाधान लाभेल असे काही करा. सतत स्वतःला नवनव्या डेडलाईन देत राहिल्यानं प्रगती होते, तुम्ही कामात राहता, पण मग मनस्वाथ्याचं काय? त्याचाही विचार करणं सध्याच्या व्यग्र दिनचर्येत आवश्यक झालंय. तो करा. नाहीतर मग आयुष्य एखाद्या रहाटगाडग्यासारखं सतत फिरत राहील. तुम्ही चालत राहाल, पण कधीतरी स्वतःकडे नीट निरखून पहाल तेव्हा वाटेल..'जगायचं राहूनच गेलं!'.

# शेअर बाजारात चढ-उताराचे सत्र सुरुच

■ मुंबई

**देशांतर्गत** शेअर बाजारात सुरू असलेल्या चढ-उताराचे सत्र आज सलग आठव्या दिवशी कायम राहिले. आठवड्याच्या आजच्या तिसऱ्या दिवशी दोन्ही प्रमुख निर्देशांक घसरणीसह बंद झाले. तर स्मॉलकॅप निर्देशांकात काहीशी वाढ दिसून आली. क्षेत्रीय निर्देशांकात बांधकाम व्यवसाय, धातू आणि तेल आणि नैसर्गिक वायू क्षेत्रात घसरण झाली. माहिती तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या समभागांवरही काहीसा दबाव दिसून आला. तर ग्राहकोपयोगी वस्तू, वाहन उद्योग आणि औषध उद्योगातील निर्देशांकात वाढ झाली. दिवसाच्या शेवटच्या तासात रिलायन्स इंडस्ट्रीजचे समभाग घसरल्याने निफ्टीला २५,५००ची पातळी राखता आली नाही.

# मुंबईत १६१ ठिकाणी दरड कोसळण्याचा धोका

मंत्री गिरीश महाजनांची माहिती

■ मुंबई

**बृहन्मुंबई** महानगरपालिका एस विभागातील बहुतांश भाग डोंगराळ वस्तीचा असून, १६१ ठिकाणी दरड कोसळण्याचा धोका आहे. या भागात संरक्षक भिंती बांधण्यासाठी ४७ कामांना ११.६३ रुपये कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी विधान सभेतील तारांकित प्रश्नोत्तरांत दिली. मुंबई शहरात डोंगराळ वस्तीत वास्तव्य करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत आमदार सुनील राऊत आणि मोहन मते यांनी खुलासा करण्याची विनंती केली होती. त्यावर महाजन यांनी हे उत्तर दिले. विक्रोळी (पूर्व) मुंबईमधील सूर्यानगर येथील शिव महाराष्ट्र नगर ते सनसिटी ही संपूर्ण वस्ती डोंगराळ भागावर वसलेली असल्याने पावसाळ्यात दरड कोसळून जीवितहानी व वित्तहानी होण्याची शक्यता आहे. विक्रोळी पार्कसाईट, साकीनाका, भांडुप, घाटकोपर हा बहुतांश भाग डोंगराळ वस्तीचा आहे. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण यांनी केलेल्या पाहणीच्या अनुषंगाने सूर्यानगर, विक्रोळी हे संभाव्य भूस्खलनाची शक्यता असणारे धोकादायक ठिकाण म्हणून निश्चित केले. पालिकेच्या एस विभागात १६१ ठिकाणी दरड कोसळण्याचा संभाव्य धोका आहे व त्यापैकी १३ ठिकाणे ही मध्यम ते गंभीर या प्रवर्गात आहेत, अशी माहिती महाजन यांनी दिली.

# आजचे राशी भविष्य



गुरुवार दि.१० जुलै २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | कामानिमित्त अचानक प्रवासाचे योग येतील. जोडीदाराची मर्जी सांभाळावी लागेल. संतती बाबत चिंता दूर होतील. |
| वृषभ | महत्वाची कामे शक्यतो पुढे ढकलावीत. घरामध्ये वाद होणार नाही याची काळजी घ्या. नवीन गुंतवणूक करताना खबरदारी घ्यावी. |
| मिथुन | आर्थिक प्रगती चांगली होईल. अडकलेली कामे मार्गी लागतील. एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन कराल. |
| कर्क | आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. नोकरीनिमित्त दूरच्या प्रवासाचे योग येतील. प्रवासात सतर्कता बाळगावी. |
| सिंह | सामाजिक क्षेत्रात नवीन ओळखी होतील. जिद्दीने नवीन योजना राबवाल. खर्चाचे प्रमाण अधिक राहील. |
| कन्या | कार्यक्षेत्रात नवीन संधी मिळतील. सहकाऱ्यांची साथ चांगली लाभेल. मित्रमंडळींकडून भेटवस्तू मिळतील. |
| तूळ | कार्यक्षेत्रात नवीन करार मदार होतील. जोडीदाराकडून आर्थिक मदत मिळेल. भावंडांचे सौख्य लाभेल. |
| वृश्चिक | हाती घेतलेले प्रकल्प पूर्ण करण्याकडे कल राहील. गुरुजनांचा आशीर्वाद लाभेल. जोडीदार त्याच्या मर्जीप्रमाणे लागेल. |
| धनु | नोकरीमध्ये तुमचे कौशल्य सिद्ध कराल. सामाजिक क्षेत्रात नावलौकिक वाढेल. मित्रमंडळींच्या गाठीभेटी होतील. |
| मकर | आर्थिक गुंतवणूक करताना खबरदारी घेणे आवश्यक. महत्त्वाची कामे पुढे ढकलली जातील. नोकरीत मान वाढेल. |
| कुंभ | आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. कुटुंबियांकडून भेटवस्तू मिळतील. संततीबाबत शुभ वार्ता समजतील. |
| मीन | कार्यक्षेत्रात अधिक परिश्रम घ्याल. प्रिय व्यक्तींच्या गाठीभेटी होतील. घरामध्ये आनंदी वातावरण राहील. |

# निकाल महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 28 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 09/07/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- **GL-03 : 3765**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0300 | 1041 | 1566 | 3404 | 5889 | 6193 | 7727 | 8026 | 8915 | 9352 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0179 | 0790 | 2123 | 2986 | 4279 | 4292 | 5217 | 6229 | 6548 | 7226 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1798 | 2988 | 3871 | 5183 | 5293 | 8052 | 8312 | 9183 | 9250 | 9561 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 300/- | 1114 | 1947 | 2716 | 4105 | 4895 | 5853 | 6694 | 7714 | 8508 | 9198 |
| 0036 | 1129 | 1984 | 2863 | 4114 | 5063 | 5911 | 6764 | 7721 | 8585 | 9199 |
| 0051 | 1152 | 2003 | 2927 | 4147 | 5152 | 5953 | 6806 | 7726 | 8663 | 9217 |
| 0052 | 1156 | 2064 | 3067 | 4174 | 5156 | 5981 | 6836 | 7735 | 8670 | 9239 |
| 0077 | 1192 | 2154 | 3120 | 4207 | 5195 | 6006 | 6856 | 7775 | 8724 | 9349 |
| 0109 | 1225 | 2199 | 3137 | 4211 | 5249 | 6108 | 6880 | 7776 | 8825 | 9382 |
| 0181 | 1511 | 2208 | 3193 | 4234 | 5278 | 6327 | 6944 | 7798 | 8832 | 9468 |
| 0242 | 1521 | 2219 | 3278 | 4261 | 5470 | 6338 | 6986 | 7815 | 8853 | 9490 |
| 0268 | 1563 | 2236 | 3342 | 4274 | 5498 | 6417 | 6987 | 7850 | 8876 | 9499 |
| 0306 | 1598 | 2242 | 3382 | 4345 | 5525 | 6498 | 7004 | 7868 | 8877 | 9509 |
| 0410 | 1618 | 2253 | 3499 | 4354 | 5553 | 6504 | 7055 | 7876 | 8878 | 9569 |
| 0710 | 1664 | 2281 | 3520 | 4384 | 5554 | 6522 | 7133 | 7907 | 8895 | 9594 |
| 0719 | 1689 | 2286 | 3529 | 4412 | 5564 | 6526 | 7137 | 8038 | 8968 | 9661 |
| 0775 | 1704 | 2372 | 3613 | 4481 | 5580 | 6530 | 7207 | 8192 | 9035 | 9789 |
| 0803 | 1714 | 2377 | 3640 | 4490 | 5668 | 6546 | 7393 | 8218 | 9046 | 9829 |
| 0808 | 1768 | 2420 | 3737 | 4504 | 5719 | 6565 | 7437 | 8277 | 9053 | 9855 |
| 0943 | 1810 | 2432 | 3762 | 4522 | 5726 | 6585 | 7507 | 8280 | 9088 | 9904 |
| 0961 | 1811 | 2445 | 3777 | 4695 | 5751 | 6652 | 7567 | 8361 | 9089 | 9921 |
| 1006 | 1831 | 2524 | 4017 | 4711 | 5809 | 6677 | 7594 | 8422 | 9107 | 9929 |
| 1021 | 1891 | 2585 | 4076 | 4747 | 5821 | 6685 | 7668 | 8488 | 9177 | 9932 |
| 1075 | 1916 | 2712 | 4094 | 4822 | 5823 | 6686 | 7711 | 8490 | 9194 | 9973 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# शुभ राशी दि. १०/०७/२०२५

| | | |
|---|---|---|
| ३ | ८ | ५ |
| ३० | ८० | ५४ |
| ३५ | ८५ | ५९ |
| १२० | १२५ | १४० |
| १३९ | १३४ | २३० |

# लॉटरी

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

सोडत दर बुधवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 28 सोडत दिनांक 09/07/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 8 लाख **AK-00 : 5587** — अंबिका एजन्सी - दादर, मुंबई, प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- **5032** — बारड लॉटरी सेंटर - सोलापूर, महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर, प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण

| बक्षिस | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1333 | 1992 | 2339 | 2968 | 5007 | 6173 | 6973 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1070 | 1110 | 1197 | 2014 | 2158 | 5542 | 7376 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1118 | 1820 | 1940 | 2001 | 4975 | 7417 | 7448 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1550 | 1620 | 1851 | 2447 | 3803 | 3940 | 7580 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1909 | 2231 | 2808 | 3269 | 3705 | 4457 | 5011 | 5511 | 5993 | 6524 | 6995 | 7602 |
| | | 1929 | 2235 | 2827 | 3283 | 3741 | 4460 | 5020 | 5530 | 5998 | 6554 | 6996 | 7612 |
| | | 1941 | 2247 | 2837 | 3292 | 3748 | 4466 | 5025 | 5538 | 6002 | 6579 | 7017 | 7629 |
| 1003 | 1417 | 1944 | 2254 | 2847 | 3312 | 3763 | 4474 | 5040 | 5539 | 6007 | 6607 | 7026 | 7633 |
| 1011 | 1437 | 1948 | 2256 | 2859 | 3313 | 3769 | 4488 | 5054 | 5552 | 6010 | 6613 | 7027 | 7644 |
| 1016 | 1439 | 1958 | 2258 | 2862 | 3315 | 3808 | 4504 | 5059 | 5556 | 6015 | 6622 | 7038 | 7658 |
| 1017 | 1478 | 1970 | 2269 | 2892 | 3317 | 3837 | 4511 | 5081 | 5559 | 6036 | 6630 | 7057 | 7670 |
| 1061 | 1479 | 1979 | 2271 | 2898 | 3348 | 3859 | 4544 | 5111 | 5563 | 6063 | 6638 | 7068 | 7678 |
| 1074 | 1493 | 1986 | 2276 | 2902 | 3358 | 3877 | 4557 | 5115 | 5569 | 6067 | 6642 | 7073 | 7693 |
| 1088 | 1500 | 2001 | 2281 | 2907 | 3363 | 3913 | 4563 | 5130 | 5576 | 6069 | 6646 | 7083 | 7700 |
| 1111 | 1501 | 2006 | 2306 | 2911 | 3365 | 3943 | 4587 | 5144 | 5577 | 6086 | 6647 | 7097 | 7703 |
| 1112 | 1508 | 2020 | 2319 | 2915 | 3368 | 4042 | 4598 | 5157 | 5578 | 6094 | 6657 | 7154 | 7707 |
| 1113 | 1513 | 2023 | 2328 | 2919 | 3372 | 4047 | 4599 | 5169 | 5609 | 6105 | 6660 | 7167 | 7716 |
| 1121 | 1517 | 2025 | 2329 | 2921 | 3380 | 4048 | 4601 | 5176 | 5611 | 6119 | 6662 | 7189 | 7731 |
| 1122 | 1531 | 2026 | 2359 | 2929 | 3382 | 4049 | 4625 | 5227 | 5615 | 6136 | 6673 | 7190 | 7744 |
| 1123 | 1536 | 2036 | 2364 | 2967 | 3383 | 4084 | 4634 | 5229 | 5625 | 6151 | 6687 | 7204 | 7747 |
| 1135 | 1588 | 2040 | 2373 | 2970 | 3392 | 4095 | 4647 | 5241 | 5628 | 6157 | 6689 | 7220 | 7757 |
| 1141 | 1590 | 2054 | 2377 | 2976 | 3393 | 4108 | 4651 | 5252 | 5667 | 6163 | 6690 | 7223 | 7768 |
| 1151 | 1597 | 2069 | 2386 | 2992 | 3396 | 4123 | 4660 | 5254 | 5703 | 6232 | 6699 | 7230 | 7771 |
| 1159 | 1599 | 2090 | 2403 | 3030 | 3399 | 4139 | 4673 | 5260 | 5725 | 6240 | 6725 | 7240 | 7783 |
| 1185 | 1608 | 2092 | 2482 | 3035 | 3403 | 4162 | 4689 | 5261 | 5735 | 6259 | 6744 | 7247 | 7787 |
| 1194 | 1611 | 2097 | 2491 | 3038 | 3408 | 4172 | 4709 | 5285 | 5746 | 6263 | 6796 | 7250 | 7789 |
| 1195 | 1616 | 2112 | 2513 | 3039 | 3447 | 4193 | 4717 | 5291 | 5758 | 6266 | 6805 | 7293 | 7799 |
| 1211 | 1641 | 2116 | 2525 | 3090 | 3453 | 4195 | 4756 | 5299 | 5759 | 6277 | 6829 | 7303 | 7818 |
| 1235 | 1676 | 2120 | 2526 | 3093 | 3477 | 4232 | 4788 | 5309 | 5765 | 6287 | 6841 | 7305 | 7827 |
| 1248 | 1687 | 2150 | 2532 | 3095 | 3493 | 4239 | 4804 | 5344 | 5790 | 6297 | 6859 | 7317 | 7836 |
| 1260 | 1695 | 2155 | 2548 | 3112 | 3497 | 4243 | 4840 | 5355 | 5804 | 6308 | 6861 | 7347 | 7849 |
| 1264 | 1715 | 2170 | 2612 | 3117 | 3502 | 4254 | 4842 | 5363 | 5821 | 6315 | 6865 | 7372 | 7863 |
| 1268 | 1729 | 2174 | 2620 | 3121 | 3509 | 4323 | 4843 | 5366 | 5850 | 6349 | 6869 | 7376 | 7875 |
| 1270 | 1735 | 2176 | 2632 | 3130 | 3534 | 4338 | 4844 | 5378 | 5851 | 6385 | 6893 | 7397 | 7879 |
| 1280 | 1738 | 2194 | 2634 | 3132 | 3545 | 4352 | 4854 | 5379 | 5853 | 6389 | 6896 | 7410 | 7904 |
| 1290 | 1788 | 2195 | 2637 | 3134 | 3549 | 4354 | 4904 | 5430 | 5874 | 6398 | 6919 | 7424 | 7908 |
| 1318 | 1801 | 2203 | 2642 | 3163 | 3571 | 4372 | 4942 | 5440 | 5879 | 6414 | 6938 | 7455 | 7909 |
| 1321 | 1814 | 2207 | 2672 | 3169 | 3579 | 4374 | 4944 | 5450 | 5914 | 6443 | 6939 | 7477 | 7916 |
| 1343 | 1860 | 2215 | 2707 | 3189 | 3582 | 4386 | 4946 | 5451 | 5945 | 6472 | 6964 | 7488 | 7923 |
| 1359 | 1865 | 2222 | 2724 | 3213 | 3596 | 4407 | 4948 | 5465 | 5953 | 6476 | 6967 | 7507 | 7927 |
| 1388 | 1881 | 2225 | 2754 | 3231 | 3626 | 4422 | 4969 | 5497 | 5960 | 6480 | 6968 | 7519 | 7929 |
| 1394 | 1901 | 2226 | 2758 | 3239 | 3684 | 4433 | 4977 | 5505 | 5965 | 6496 | 6987 | 7541 | 7972 |
| 1404 | 1906 | 2229 | 2792 | 3247 | 3699 | 4448 | 4995 | 5507 | 5971 | 6504 | 6994 | 7556 | 7975 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# निकाल गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 28 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 09/07/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- **MG-07 : 2268**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 2000/-: 4223; 6475 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली); 7904 (आर. के. एन्टरप्रायझेस, चर्चगेट); 8300 (लॉटरी भांडार - नागपूर); 9453 (श्री एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई)

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0754 | 2427 | 2858 | 3739 | 5382 | 6292 | 6805 | 7457 | 7461 | 9081 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0838 | 2085 | 2635 | 3421 | 4139 | 4347 | 5124 | 5414 | 7329 | 7644 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0009 | 1019 | 1863 | 2702 | 4150 | 5281 | 6150 | 7407 | 8348 | 9049 |
| 0036 | 1061 | 1914 | 2722 | 4245 | 5374 | 6276 | 7496 | 8388 | 9058 |
| 0055 | 1066 | 1982 | 3035 | 4356 | 5379 | 6279 | 7651 | 8478 | 9109 |
| 0063 | 1110 | 2022 | 3259 | 4434 | 5465 | 6388 | 7689 | 8525 | 9189 |
| 0098 | 1130 | 2117 | 3320 | 4532 | 5514 | 6650 | 7777 | 8533 | 9225 |
| 0136 | 1157 | 2208 | 3344 | 4603 | 5573 | 6678 | 7818 | 8558 | 9266 |
| 0214 | 1186 | 2224 | 3393 | 4619 | 5684 | 6692 | 7847 | 8628 | 9599 |
| 0288 | 1257 | 2226 | 3531 | 4637 | 5723 | 6701 | 7883 | 8778 | 9665 |
| 0315 | 1518 | 2326 | 3582 | 4649 | 5833 | 6761 | 7957 | 8804 | 9697 |
| 0500 | 1533 | 2394 | 3688 | 4691 | 5860 | 6767 | 8094 | 8830 | 9809 |
| 0540 | 1580 | 2420 | 3734 | 4774 | 5971 | 6868 | 8216 | 8862 | 9862 |
| 0770 | 1751 | 2439 | 3868 | 4857 | 5988 | 6933 | 8301 | 8872 | 9909 |
| 0875 | 1840 | 2453 | 4047 | 4940 | 6069 | 7176 | 8314 | 8970 | 9933 |
| 0896 | 1862 | 2596 | 4112 | 5111 | 6123 | 7292 | 8328 | 9009 | 9996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# निकाल महाराष्ट्र सह्याद्री

महाराष्ट्र राज्य लॉटरी — • विजयालक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 28 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 09/07/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- **SV-00 : 4295**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 1188 | 1247 | 1393 | 2233 | 3013 | 3253 | 3790 | 3907 | 5572 | 5655 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 1000 | 1234 | 1833 | 3134 | 3854 | 4356 | 4671 | 4877 | 5740 | 5930 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1061 | 1571 | 3087 | 4118 | 4797 |
| 1101 | 1712 | 3171 | 4140 | 4826 |
| 1128 | 1817 | 3210 | 4354 | 4833 |
| 1145 | 1831 | 3277 | 4364 | 4847 |
| 1160 | 1952 | 3296 | 4464 | 4856 |
| 1279 | 2226 | 3300 | 4466 | 4904 |
| 1309 | 2293 | 3360 | 4496 | 5045 |
| 1337 | 2412 | 3386 | 4525 | 5112 |
| 1401 | 2422 | 3551 | 4641 | 5517 |
| 1413 | 2562 | 3734 | 4700 | 5894 |
| 1460 | 2902 | 3797 | 4706 | 5952 |
| 1468 | 2922 | 3969 | 4740 | 5953 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

देश विदेश

# हत्तीणीच्या प्रसुतीसाठी रेल्वे दोन तास थांबली

■ रांची

**मानव** आणि जंगली हत्ती यांच्यातील संघर्षाबाबत देशात दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या झारखंडमधून मानवी सहिष्णुतेचे एक सुखद उदाहरण समोर आले आहे. येथे एक गर्भार हत्तीण जंगलातून जाणाऱ्या रेल्वे मार्गावर विव्हळत होती. तिला प्रसुती कळा असह्य झाल्या होत्या. तिची ती अवस्था जाणून वनरक्षकाने वेळीच रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून या मार्गावरील रेल्वे गाड्या काही वेळासाठी थांबवण्याची विनंती केली. रेल्वे प्रशासनानेही मानवतेचे दर्शन घडवत त्या मार्गावरील रेल्वे वाहतूक तब्बल दोन तास रोखून ठेवली.

ही घटना दोन आठवड्यांपूर्वीची असली तरी ती नुकतीच माध्यमांसमोर आली आहे. राज्यातील बरकाकाना आणि



हजारीबाग या रेल्वे स्थानकादरम्यान ही घटना घडली. हा रेल्वेमार्ग जंगलातून जातो. या मार्गावरून केवळ माल वाहतूक करणाऱ्या मालगाड्या ये-जा करतात. रात्रपाळीवरील वनरक्षक या परिसरात गस्त घालत होता. पहाटेचे पावणेतीन वाजले होते.

गस्त घालताना हा कर्मचारी रेल्वेमार्गाजवळ आला असता त्याला एक गर्भार हत्तीण रेल्वे रुळावर विव्हळत असल्याचे दिसले. काही वेळात ती प्रसूत होणार हे त्याने ताडले. अशा परिस्थितीत तिला तेथून दूर करणे तिच्या आणि तिच्या पिलासाठी धोक्याचे ठरू शकले असते. त्यामुळे या कर्मचाऱ्याने प्रसंगावधान राखून रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांना परिस्थितीची कल्पना दिली. या मार्गावरील रेल्वे वाहतूक काही वेळासाठी थांबवण्याची विनंती केली. त्याचवेळी या मार्गावरून कोळसा वाहून नेणारी एक मालगाडी चालली होती. रेल्वे अधिकाऱ्यांनी मोटरमनला गाडी जागीच थांबवण्याची सूचना दिली. गाडी तब्बल दोन तास जागीच थांबली आणि अखेर हत्तीणीने पिलाला जन्म दिला. काही वेळाने ती पिलासह रेल्वे रूळापासून दूर निघून गेली. त्यानंतर ती मालगाडी मार्गस्थ झाली.

# टेक्सास पुरात १०४ मृत अद्याप ४१ जण बेपत्ता

■ टेक्सास

**टेक्सासमध्ये** गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीत मृत झालेल्यांची संख्या आज १०४ वर गेली आहे. अद्याप ४१ जण बेपत्ता असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. टेक्सासमधील पुरामध्ये केर काऊंटी या परगण्यात सर्वाधिक बळी गेले आहेत. येथील नदीकिनारी असलेल्या मुलींच्या उन्हाळी शिबिरातील सर्व २८ मुलींचा मृत्यू झाल्याची माहितीही प्रशासनाने दिली. या पुरामुळे ट्रॅव्हिस, बर्नेट व विलीम्सन त्याचप्रमाणे केंटाल व टॉम ग्रीन परगण्यातही अनेकांना जीव गमवावा लागला आहे. या भागात नदीकिनारी सायरन लावण्यात आले नसल्याने धोक्याची सूचना देता आली नाही.



# खाद्यपदार्थात चुकीचे रंग २३३ विद्यार्थ्यांना विषबाधा

■ बीजिंग

**चीनमधील** एका शाळेतील आचाऱ्याने खाद्यपदार्थ सजवण्यासाठी अखाद्य रंगाचा वापर केल्याने २३३ विद्यार्थ्यांना विषबाधा झाली. या विद्यार्थ्यांवर रुग्णालयात उपचार करण्यात आले. चीनच्या गांसु प्रांतातील टियानशुई शहरातील एका शिशुवर्गात ही घटना घडली. या शाळेच्या आचाऱ्याने मुलांना दिलेले पदार्थ अधिक सजवण्यासाठी विविध रंगांचा वापर केला. या रंगांमुळे या विद्यार्थ्यांच्या रक्तातील शिशाचे प्रमाण वाढले. त्यानंतर त्यांना रुग्णालयात नेण्यात आले. या आचाऱ्याने विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या लाल खजुराचा केक व सॉसेज कॉर्न बन हे पदार्थ खाल्ल्यानंतर विद्यार्थ्यांना त्रास जाणवू लागला. स्थानिक प्रशासनाने या अन्नांचे नमुने तपासल्यानंतर त्यात अखाद्य घटकांचा वापर झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. चिनी पोलिसांनी या प्रकरणी आठ जणांना तातडीने अटक केली. शाळेच्या मुख्याध्यापकांनीच हे रंग ऑनलाईन मागवायला सांगितले होते. त्यानुसार हे पदार्थ मागवण्यात आले होते असे पोलिसांनी म्हटले आहे. आता या प्रकरणी या पदार्थांचा पुरवठा करणाऱ्यावरही कारवाई होणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

# तिरुपती मंदिराच्या अधिकाऱ्याची चर्चमध्ये गेल्यामुळे हकालपट्टी

■ अमरावती

**आंध्र** प्रदेशमधील जगप्रसिध्द तिरुपती बालाजी मंदिरातील एक अधिकारी चर्चमध्ये होणाऱ्या प्रार्थनेला उपस्थित राहिल्याने तिरुमला तिरुपती देवस्थानने त्याची तत्काळ हकालपट्टी केली. ए राजाशेखर बाबू असे या अधिकाऱ्याचे नाव आहे. ते तिरुमला तिरुपती देवस्थानमध्ये सहाय्यक कार्यकारी अधिकारी पदावर कार्यरत होते. चर्चमध्ये प्रार्थनेला उपस्थित राहिल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. त्याची गंभीर दखल घेत देवस्थानने त्यांना निलंबित केले आहे. या कारवाईचा बराच गवगवा झाला. त्यानंतर देवस्थानने स्पष्टीकरण दिले की, गैरहिंदू धार्मिक कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अशा प्रकारची शिस्तभंगाची कारवाई केली जाते.

# मुदत संपल्यानंतर १७ औषधे फ्लश करण्याच्या केंद्राच्या सूचना

**नवी दिल्ली-** केंद्र सरकारने १७ प्रकारच्या औषधांची मुदत संपल्यानंतर ती औषधे सांडपाण्यातून टाकण्याच्या सूचना दिल्या आहेत. केंद्रीय औषधे दर्जा नियंत्रण संस्था अर्थात सीडीएससीओने हे निर्देश दिले असून, ही औषधे थेट शौचालयातून फ्लश करावीत अशा सूचना दिल्या आहेत. या औषधांमध्ये फेनटॅनेल, फेनटॅनेल सायट्रेट, मोरफिन सल्फेट, बुपरेमोरफिन हायड्रोक्लोराईड आदी धोकादायक घटक असल्यामुळे या सूचना देण्यात आल्या आहेत. ही औषधे उघड्यावर किंवा कचऱ्यातही फेकून देण्याच्या लायकीची नाहीत, असेही या निर्देशात म्हटले आहे.

# पेरूमध्ये सापडले ३, ५०० वर्षांपूर्वीचे शहर

■ लिमा

**पुरातत्त्व** संशोधकांना पेरू देशात साडेतीन हजार वर्षे जुन्या शहराचे अवशेष सापडले आहेत. हे शहर त्याकाळी प्रमुख व्यापारी शहर होते व त्याचा संबंध आखाती व आशियाई देशातील व्यापाराशी होता. ज्या काळात भारतासह इतर देशांमध्ये नगरे वसली होती त्याच काळात अमेरिकेतील या शहरातूनही व्यापार चालत असल्याचे संशोधकांनी म्हटले आहे. पेरू देशाच्या उत्तरेला असलेल्या बारांका परगण्याजवळ या शहराचे अवशेष सापडले आहेत. पेनिको असे या शहराचे नाव असून, या देशातून अमेरिकेच्या एडन्स पर्वतरांगा व ॲमेझॉनच्या खोऱ्यांमध्ये व्यापार चालत होता. या शहराची स्थापना खिस्तपूर्व १८०० ते १५०० या काळात झाली असावी. त्याचप्रमाणे इथे अगदी सुरुवातीला मानवी संस्कृती नांदल्याच्या अनेक खुणा



आढळल्या आहेत. अमेरिकेच्या कराल संस्कृतीच्या विकासावर या संशोधनाच्या माध्यमातून अधिक प्रकाश पडेल. लिमा या पेरुच्या राजधानीपासून उत्तरेला २०० किलोमीटर अंतरावर हे शहर असून ते समुद्र सपाटीपासून ६०० मीटर उंचीवर आहे.

# विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड आता अदानी पॉवरच्या ताब्यात

■ मुंबई

**अदानी** पॉवर लिमिटेडने विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेडचा ६०० मेगावॅटचा प्रकल्प खरेदी केल्याची घोषणा केली. हा प्रकल्प अदानी पॉवरने ४ हजार कोटी रुपयांना खरेदी केला. राष्ट्रीय कंपनी कायदा लवादाच्या मुंबई खंडपीठाने १८ जून रोजी विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड आणि अदानी पॉवर लिमिटेडच्या प्रस्तावाला मंजुरी दिली.

अदानी पॉवर लिमिटेडने सोमवारी या प्रकल्पाला मान्यता दिली असून, ताबा व अंमलबजावणीची प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यामुळे




आता अदानी पॉवरची क्षमता १८१५० मेगावॅट झाली आहे. अदानी पॉवरने २०२९-३० पर्यंत ३०६७० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता करण्याचे ठरवले आहे. अदानी पॉवर सध्या सहा ब्राऊनफिल्ड अल्ट्रा सुपरक्रिटिकल पॉवर थर्मल प्रकल्प उभारणीचे काम सुरू आहे.

प्रत्येक प्रकल्पाची क्षमता १,६०० मेगावॅट आहे. हे प्रकल्प सिंगरौली महान (मध्य प्रदेश), रायपूर-रायगड आणि कोरबा (छत्तीसगड), कवाई (राजस्थान) उत्तर प्रदेशातील मिर्झापूर येथे उभारले जातील.

# बीडमध्ये अभियंत्यांसमोरच ट्रक खड्ड्यात कोसळला

■ बीड

**बीड** जिल्ह्याच्या वडवणी तालुक्यातील खडकी गावात रस्त्याची पाहणी करत असलेल्या अभियंत्यांसमोरच एक ट्रक खड्ड्यात कोसळला. या अपघातातून अभियंत्यासह पाहणी करणारे कर्मचारी थोडक्यात बचावले. खडकी गावात पुलाचे काम सुरू असल्यामुळे पर्यायी रस्ता करून द्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे केली होती. यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते आणि अधिकारी पाहणीसाठी घटनास्थळी आले होते. पाहणी सुरू असतानाच एक मालवाहू ट्रक अचानक खड्ड्यात कोसळला. दरम्यान, या अपघातानंतर स्थानिकांनी पुलाचे काम पूर्ण करा, अशी मागणी पुन्हा एकदा केली.

# बांधकामांच्या निष्कासनाची खर्च वसुली की, पुन्हा कारवाई? म्हाडा द्विधा मनस्थितीत

■ मुंबई

**म्हाडाच्या** जमिनीवर उभ्या राहणाऱ्या बेकायदा बांधकामांवर तोडक कारवाई केली जाते. निष्कासन कारवाई दरम्यान होणाऱ्या खर्चाची वसुली बांधकाम मालकांकडून केली जाते. मात्र पाडलेली बांधकामे पुन्हा उभी राहिल्यामुळे आता पुढे करायचे काय? अशा द्विधा मनस्थितीत म्हाडाचे अतिक्रमण निर्मूलन विभाग सापडला आहे, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली. म्हाडा मुंबई मंडळाच्या वसाहती व मोकळ्या जमिनीवर म्हाडाची परवानगी न घेता उभ्या राहणाऱ्या बांधकामांना बेकायदा ठरवून त्यांच्यावर अतिक्रमण निर्मूलन कक्षामार्फत निष्कासनाची कारवाई केली जाते. या दरम्यान कारवाईवर झालेल्या खर्चाची वसुली बांधकाम मालकाकडून करण्यात येते. मात्र हीच पाडलेली बांधकामे पुन्हा उभी राहिल्यामुळे अतिक्रमण निर्मूलन विभागाची डोकेदुखी वाढली आहे. त्यामुळे आता करायचे काय? असा सवाल अधिकाऱ्याकडून विचारला जात आहे.

# आलिया भट्टच्या सहाय्यिकेला फसवणूक प्रकरणी अटक

■ मुंबई

**हिंदी** चित्रपट अभिनेत्री आलिया भट्टची सहाय्यिका वेदिका प्रकाश शेट्टी हिला आलिया भट्टची ७६ लाख रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी अटक करण्यात आली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली.

**फसवणूक प्रकरणी पोलिसांची कारवाई**

वेदिका शेट्टी हिने आलियाची निर्मिती संस्था असलेल्या इटर्नल सनशाईन प्रॉडक्शन आणि अभिनेत्रीच्या खात्यातून पैसे काढल्याप्रकरणी तिला अटक करण्यात आली आहे. तिने या दोन्ही खात्यांमधून तब्बल ७६ लाख रुपये काढले होते. मुंबई पोलीस तिच्या बँक खात्यांची व आर्थिक व्यवहारांची तपासणी करत आहेत.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवाकाळ
।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# परिपूर्णतेसाठी गुरुपौर्णिमा

**ज्ञान,**भक्ती,कर्म या तीनही गोष्टींच्या प्राप्तीकरीता ज्ञानसंपन्न मार्गदर्शकाची किंवा गुरूची आवश्यकता असते. परमेश्वराची अनन्यभावाने केलेली भक्ती ही ज्ञानप्राप्तीचा मार्ग सोपा करते. ज्ञान आणि भक्ती या दोन्ही गोष्टींचा जेव्हा समन्वय घडून येतो. त्यावेळेला केलेले कर्म समाधान देणारे किंबहुना फळाची आशा न करता कार्य करण्याची प्रेरणा देणारे असते. हाच भारतीय संस्कृतीचा प्रवास अनादीकाळापासून सुरू आहे आणि तो अखंड सुरू ठेवण्यामध्ये गुरू या संस्थेचा फार मोठा वाटा आहे. आजच्या गुरूपौर्णिमेच्या निमित्ताने गुरू म्हणजे काय,गुरू कोणास म्हणावे, गुरू या शब्दाचा अर्थ काय. या सर्वच गोष्टींविषयीचे मनन, चिंतन करण्याची संधी प्राप्त होते. आजच्या या पौर्णिमेला व्यासपौर्णिमा म्हटली जाते. व्यास या शब्दातच पूर्णता व्यापून भरलेली आहे. ईश्वरी अवतार असलेले व्यास ज्ञानसंपन्न होते. वेदांच्या अध्ययनापासून ते महाभारताच्या आणि अनेक उपनिषदांच्या रचनांचे श्रेय त्यांच्याकडे जाते. महर्षी वेदव्यास हे असे परिपूर्ण व्यक्तिमत्व होते की त्या ठिकाणी परमेश्वराविषयी उत्कट भक्ती , ज्ञानाची परिपूर्णता आणि सतत समाजाला मार्गदर्शन करण्याचा त्यांनी घेतलेला वसा हेच त्यांचे कर्म मानले जाते. अशा तीनही गोष्टींची संपन्नता लाभलेल्या वेदव्यासांविषयी आदर, कृतज्ञता व्यक्त करण्याच्या निमित्ताने आषाढ पौर्णिमेचा दिवस हा व्यासपौर्णिमेचा दिवस म्हणूनही साजरा होतो. आज अनेक ठिकाणी गुरूंची वेगवेगळ्या स्वरूपात पूजा, अर्चा किंवा आराधना होते. अनेक पंथ, संप्रदायांमधून किंवा शिक्षण, अध्यात्म, संगीत, कला या क्षेत्रातही आपल्याला मार्गदर्शन करणाऱ्या गुरूंविषयी आदर व्यक्त केला जातो. मर्यादित अर्थाने आपल्याला शिकवणारी किंवा मार्गदर्शन करणारी व्यक्ती म्हणजे गुरू असे मानून तिच्याविषयीची कृतज्ञता आजच्या दिवशी व्यक्त करण्याचा प्रयत्न होतो.

**निर्मळ ज्ञान आणि सद्‌गुरू**

गुरू या शब्दात अज्ञानाचा अंधार दूर करणारा असाच अर्थ दडलेला आहे. ज्याच्याकडे ज्ञानलालसा, त्याग आणि तपश्चर्येतून केवळ समाजाच्या व्यक्तीच्या किंबहुना विश्वाच्या कल्याणासाठीच देह झिजवण्याचा संकल्प ज्यांनी केला आहे. अशांनाच गुरू म्हटले जाते. समर्थ रामदासांनी सद्‌गुरूंचे लक्षण सांगताना असे म्हटले होते की

मुख्य सद्‌गुरूचे लक्षण, आधी पाहिजे विमळ ज्ञान।
निश्चयाचे समाधान स्वरूपस्थिती।
याच्यापुढे जाऊन समर्थ सांगतात,
जेथे सारासार विचार, तेथे होय जगदोद्धार।
नवभक्तीचा आधार, बहुत जनांसी।

या ओव्यांमधून सहजपणे गुरूंची लक्षणे लक्षात येतात. त्यातला पहिला निकष म्हणजे ज्या गुरूने केवळ ईश्वरप्राप्तीसाठी सर्वच प्रकारचा त्याग केलेला आहे. अखंड साधनेतून तपश्चर्येतून एकूणच या सृष्टीविषयीचे ज्ञान प्राप्त केलेले आहे. किंबहुना ईश्वरी कृपेने ज्ञानाचे वरदान प्राप्त झालेल्यांना गुरूस्थानी मानले जाते. म्हणूनच समर्थांनी गुरूकडे विमळ ज्ञान असले पाहिजे असे म्हटले आहे. ज्या ज्ञानातून व्यक्ती किंवा समाजामध्ये निर्मळता निर्माण व्हावी. ज्या ज्ञानातून अहंकार, क्रोध, मत्सराचा नाश व्हावा. किंबहुना सत्कर्मावरच श्रद्धा निर्माण करण्याचा प्रकार जिथे घडून येतो तिथे खऱ्या अर्थाने सद्‌गुरूंची किमया प्रत्यक्षात आल्याचे मानले जाते. संत ज्ञानेश्वरांनीसुद्धा गुरूविषयी आपला अभिप्राय व्यक्त करताना असे म्हटले होते की

गुरू बहुतांची माय। परि एकलौती होऊनी ठाये।
तैसे करूनी आण वाये। कृपेतिये.

गुरू ही अनेक शिष्याची माता आहे. ती माझी एकट्याचीच आई होऊन राहील आणि ती माझ्याशीच अनन्य होऊन राहाण्याची शपथ मी तिच्याकडून घेईन. अशी ही गुरूविषयीची अनन्यता माऊलींनी व्यक्त केली होती. ज्यामधून गुरुविषयीचे समर्पण व्यक्त होतेच परंतु गुरूविषयी ही दास्यभक्ती निर्माण करण्यासाठी गुरुकडून तशा प्रकारचे ज्ञान प्राप्त करण्याची उत्सुकता आणि जिज्ञासाही महत्त्वाची ठरत असते. गुरूपौर्णिमेचे वैशिष्ट्य हे आहे की या दिवशी गुरूपूजनाबरोबरच स्वतःमधली पूर्णता शिष्याने अनुभवायची असते. आपल्यामध्ये असलेली न्यूनता किंवा अपूर्णता भरून काढण्यासाठी प्रयत्न करायचे असतात. तेच खऱ्या अर्थाने गुरूपूजन म्हणता येते. ज्ञान, भक्ती, आणि त्याप्रमाणे प्रत्येक कर्म करण्याची प्रवृत्ती हा गुरूकडून घेतलेला वसा असतो. तो जपण्याचा प्रयत्न करणे यासाठी आजचा दिवस महत्त्वाचा ठरतो.

**गुरू व्यक्ती नव्हे संस्था**

गुरू ही एकाअर्थी तत्त्वरूप संस्था आहे. प्राचीन काळापासून गुरूब्रह्मा गुरूर्विष्णू, गुरूर्देवो महेश्वरः असे म्हणत उत्पत्ती, स्थिती आणि लय याचे संतुलन साधणाऱ्या तत्त्वांची केलेली आराधना ही प्रत्यक्ष परब्रह्माला प्राप्त करण्याची साधना ठरते. यासाठी शिष्याला तयार करण्याचे शिष्याचा सांभाळ करण्याचे आणि शिष्याला सातत्याने योग्य त्या मार्गावर आणण्याचे काम ही तीन तत्त्वे करीत असतात. यातून शिष्याने आपली पात्रता वाढवत नेणे म्हणजेच गुरूंची सेवा करण्यासारखे ठरते. खरे तर याची सुरूवात ही आई-वडिलांपासून होते. पहिले गुरू ते असतात. नंतर आपापल्या क्षेत्रातल्या मार्गदर्शनासाठी किंवा ज्ञान मिळवण्यासाठी आपल्याला लाभणारे मार्गदर्शक हेसुद्धा गुरूस्थानी असतात. परंतु संसार, प्रपंच व्यवसाय करणाऱ्यांना गुरू हा आपल्या अडीअडचणी सोडवण्यासाठी हवा असतो. परंतु गुरूंनी सांगितलेली साधना जर योग्य पद्धतीने केली नाही किंवा कोणत्याही व्यक्तीला गुरू न मानता आपल्या इष्टदेवतेलादेखील गुरूस्थानी मानून केलेली अखंड साधना ही गुरूतत्त्वाचेच लाभ देणारी ठरते. भारतीय संस्कृतीत भगवान शंकरांना आदिगुरू मानलेले आहे. आणि त्याच शिवतत्त्वाचा अविर्भाव असलेल्या दत्तात्रेयांची गुरुस्थानी पूजा केली जाते. याचा अर्थ केवळ व्यक्तीला गुरु मानून आणि आपल्या केवळ सांसारिक, व्यावहारिक अडचणींसाठी गुरू करण्याचा प्रकारही समाजात पाहायला मिळतो. अर्थातच मानसिक समाधानासाठी अनेकांना त्याचा लाभही होत असावा. परंतु गुरुपौर्णिमेचे महत्त्व हे स्वतःमधली पूर्णता शोधण्यासाठी आणि त्यातून ज्ञान, भक्ती आणि कर्माचा समन्वय साधण्यासाठी आहे.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**सोज्वळता आणि सत्य या दोन्हीत एक समानता असते, दोन्हींना कधीही सजवण्याची गरज नसते.**

**पंचांग**

**गुरुवार, १० जुलै, २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**आषाढ पौर्णिमा**
**नक्षत्र : पूर्वाषाढा**



**रवी उदय- ०६-०९**
**रवी अस्त- १९-१९**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० धनु**

**गुरुपौर्णिमा; व्यास पूजा; संन्यासीना चातुर्मासारंभ; शिर्डी उत्सव, पौर्णिमा समाप्ती उत्तररात्री २.०६**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### शिंगाड्याचा शिरा



★ **साहित्य :-**
१-वाटी शिंगाड्याचे पीठ
२-चमचा तूप
२-चमचा साखर
१-ग्लास गरम पाणी
मिक्स ड्रायफ्रुट पावडर (आवश्यकतेनुसार)

★ **कृती :-** सर्वप्रथम गरम कढईत २ चमचे तूप घालून त्यात शिंगाड्याचे पीठ छान परतून घ्या. पीठ खमंग भाजल्यानंतर त्यात गरम पाणी घालून ते परतून घ्या. १-२ मिनिटे परतल्यानंतर त्यात २ चमचे साखर घाला. आता त्यात ड्रायफ्रुट पावडर घाला.हे सर्व मिश्रण ३-४ मिनिट परतल्यानंतर गॅस बंद करा. गरमा-गरम शिंगाड्याच्या पीठाचा शिरा सर्व्ह करा.

# आजपासून भारत-इंग्लंडमध्ये तिसरी कसोटी जोफ्रा आर्चरच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील ५ कसोटी मालिकेचा तिसरा सामना उद्यापासून लॉर्ड्सच्या क्रिकेट मैदानावर खेळवला जाणार आहे. इंग्लंडने पहिली कसोटी आणि दुसरी कसोटी भारताने जिंकली. यासह भारत आणि इंग्लंड मालिकेत १-१ असे बरोबरीत आहेत. त्यामुळे दोन्ही संघांना तिसरा कसोटी सामना खूप महत्त्वाचा असणार आहे. भारताविरूद्ध तिसऱ्या कसोटीसाठी इंग्लंडने प्लेईंग इलेव्हन जाहीर केली.**



■ लंडन

**इंग्लंड** संघाने लॉर्ड्स कसोटीसाठी संघात खूप मोठे बदल केले. संघात एक बदल करण्यात आला आहे, जो आधीच अपेक्षित होता. इंग्लंड संघाने जोफ्रा आर्चरच्या संघात समावेश केला आहे. जोफ्रा आर्चर दुसऱ्या सामन्यापूर्वीच संघात सामील झाला होता. पण तो दीर्घ दुखापतीनंतर पुनरागमन करत असल्याने खबरदारी म्हणून त्याला प्लेईंग इलेव्हनबाहेर ठेवण्यात आले होते. आता तो पुनरागमन करण्यास पूर्णपणे सज्ज झाला आहे आणि तिसरा कसोटी सामना खेळताना दिसणार आहे.

जोफ्रा आर्चर ४ वर्षांनंतर इंग्लंडच्या कसोटी संघात पुनरागमन करत आहे. दुखापतीपूर्वी जोफ्रा आर्चरने भारताविरुद्ध शेवटचा कसोटी सामना खेळला होता. २०१९ मध्ये कसोटी पदार्पण करणाऱ्या जोफ्रा आर्चरने फेब्रुवारी २०२१ मध्ये अहमदाबाद येथे भारताविरुद्ध कसोटी सामना खेळला. आता योगायोगाने जोफ्रा सुमारे साडेचार वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर कसोटी क्रिकेटमध्ये भारताविरूद्ध सामन्यातूनच पुनरागमन करत आहे. इंग्लंडसाठी आतापर्यंत १३ कसोटी सामने खेळलेल्या जोफ्राने ४२ विकेट घेतल्या आहेत. याशिवाय इंग्लंडच्या ताफ्यात कोणताच बदल करण्यात आलेला नाही. लॉर्ड्स कसोटीत जसप्रीत बुमराहचे भारतीय संघामध्ये पुनरागमन निश्चित आहे. त्यामुळे लॉर्ड्सच्या खेळपट्टीवर बुमराह आणि सिराज या दोघांचा सामना करणे इंग्लंडच्या फलंदाजांसाठी मोठे आव्हान ठरणार आहे. बुमराह आणि सिराज या दोघांनाही आजवर लॉर्ड्सच्या मैदानावर प्रत्येकी एक कसोटी सामना खेळण्याची संधी मिळाली आहे. बुमराहने येथे खेळलेल्या एका सामन्यातील दोन डावांमध्ये गोलंदाजी करताना ३७.३३ च्या सरासरीने एकूण ३ बळी मिळवले आहेत. दुसरीकडे सिराजने दोन डावांमध्ये गोलंदाजी करताना केवळ १५.७५ च्या उत्कृष्ट सरासरीने ८ बळी घेतले आहेत.

## प्रो कबड्डी लीगचा १२वा हंगाम २९ ऑगस्टपासून सुरू होणार

■ मुंबई

भारतातील सर्वात लोकप्रिय लीगपैकी एक असलेल्या प्रो कबड्डी (पीकेएल) लीगचा १२वा हंगाम २९ ऑगस्ट रोजी सुरू होणार आहे. पीकेएलचे आयोजक मशाल स्पोर्ट्स यांनी आज ही अधिकृत घोषणा केली. गतवर्षी पहिल्यांदाच विजेतेपद पटकावणारी हरियाणा स्टिलर्स टीम यंदा आपले जेतेपद वाचवण्यासाठी सज्ज झाली आहे. ३१ मे आणि १ जून रोजी मुंबईत पार पडलेल्या खेळाडूंच्या लिलावात, दहा खेळाडूंना १ कोटींहून अधिक रकमेची बोली मिळाली. जे लीगच्या इतिहासात एक मोठे पाऊल मानले जात आहे. यामुळे हंगामात सामना अधिक अटीतटीचे होणार आहेत, याबाबत शंका नाही.

पीकेएलचे लीग कमिशनर अनुपम गोस्वामी यांनी सांगितले, सीझन १२ ची सुरुवात जाहीर करताना आम्हाला खूप आनंद होतो आहे. यंदाच्या लिलावाने सगळे विक्रम मोडले. त्यामुळे हंगाम अधिक स्पर्धात्मक होणार आहेत. चाहत्यांना कबड्डी ॲक्शनचा जबरदस्त अनुभव देण्यासाठी आम्ही उत्साहित आहोत.

## झिम्बाब्वेविरुद्ध कसोटी मालिका न्यूझीलंडचा क्रिकेट संघ जाहीर

**वेलिंग्टन -** झिम्बाब्वे विरुद्ध होणाऱ्या २ सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी न्यूझीलंडने संघ घोषित केला. वेगवान गोलंदाज मॅथ्यु फिशर या नवोदिताला संधी दिली. या मालिकेसाठी टॉम लॅथमकडे कर्णधारपद सोपविण्यात आले. मॅथ्यु फिशरने १९ वर्षांखालील वयोगटातून खेळताना १४ प्रथमश्रेणी सामन्यातून ५१ गडी बाद करून निवड समितीचे लक्ष्य वेधून घेतले आहे. २५ वर्षीय फिशर आता आपले कसोटी पदार्पण छिम्बाब्वेविरुद्ध करेल. या मालिकेतील पहिली कसोटी बुलावायो येथे ३० जुलै ते ३ ऑगस्ट तर दुसरी आणि शेवटची कसोटी बुलावायोमध्ये ७ ते ११ ऑगस्ट दरम्यान खेळविली जाईल. न्यूझीलंड संघामध्ये निकोल्सचे २०२३ नंतर पुनरागमन होत आहे.

## रायगडमध्ये १९ व २० जुलैला कॅरम स्पर्धा

■ रायगड

**रायगड** जिल्हा कॅरम असोसिएशन व झुंझार युवक मंडळ पोयनाड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धा १९ आणि २० जुलैला पोयनाडच्या जय मंगल कार्यालय पांडवादेवीमध्ये पार पडणार आहे. ही स्पर्धा पुरुष एकेरी खुल्या गटामध्ये खेळविण्यात येणार असून, रायगड जिल्ह्यातील कॅरम खेळाडूंनी ११ जुलैला सायंकाळी ६ वाजेपर्यंत स्पर्धा शुल्कासह आपले नाव प्रतिनिधींकडे नोंदवावे. या कॅरम स्पर्धेकरिता 'सुरको किंग' या कंपनीचे कॅरम बोर्ड वापरण्यात येणार आहेत. या स्पर्धे त रायगड जिल्ह्यातील जास्तीतजास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा कॅरम असोसिएशनचे सचिव दीपक साळवी यांनी केले.

**फॉर्म बी**
**जाहिर घोषणा**
**(इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (परिसमापन प्रक्रिया) रेग्युलेशन्स, २०१६ चे नियम १२ अन्वये)**
**व्हिलबेरी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ. क्र. | तपशिल | वर्णन |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **व्हिलबेरी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | १० जुलै २००८ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | आरओसी- मुंबई, महाराष्ट्र |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U85100MH2008PTC184527 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | १३०, शांता इंडस्ट्रियल इस्टेट, पहिला मजला, आय. बी. पटेल रोड, गोरेगाव पूर्व, मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००६३ |
| ६ | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया बंद करण्याची तारीख | ३०.०६.२०२५ |
| ७ | कॉर्पोरेट ऋणकोंची परिसमापन प्रारंभ तारीख | आदेश दिनांक ३०.०६.२०२५<br>आदेश प्राप्त दिनांक - ०७.०७.२०२५ |
| ८ | परिसमापक म्हणून कार्यरत दिवाळखोरी अधिकाऱ्याचे नाव व नोंदणी क्रमांक | मे. वॉटरफॉल इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल प्रायव्हेट लिमिटेड आयबीबीआय नोंद. IBBI/IPE-0022/IPA-1/2022-23/50016<br>नियुक्त संचालक : श्री. गौरांग सी. शहा आयबीबीआय नोंद. IBBI/IPA-002/IP-N00947/2019-2020/13002 |
| ९ | मंडळासह नोंदणीकृत प्रमाणे परिसमापकाचे पत्ता व ई-मेल | पत्ताः १२०४, मेकर चेम्बर्स ५, नरीमन पॉइंट, मुंबई- ४०००२१<br>ई-मेल आयडीः waterfall0421@gmail.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचे पत्ता व ई-मेल | मे. वॉटरफॉल इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड<br>पत्ताः १२२१, मेकर चेम्बर ५, नरीमन पॉइंट, मुंबई- ४०००२१<br>ई-मेल आयडीः ip.vhpl@gmail.com |
| ११ | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | ०६.०८.२०२५ (परिसमापनाचा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवस) |

येथे सूचना देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण मुंबई यांनी ३०.०६.२०२५ रोजी **व्हिलबेरी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड**चे परिसमापन सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
**व्हिलबेरी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड**च्या भागधारकांना ०६.०८.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी पुराव्यासह त्यांचे दावे बाब क्र.१० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर परिसमापकाकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात. दाव्यांचा खोटा किंवा दिशाभूल करणारा पुरावा सादर केल्यास दंड आकारला जाईल.
परिसमापन प्रक्रियेदरम्यान भागधारक आपले दावे सादर करत नसल्यास, इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ अंतर्गत कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेदरम्यान अशा भागधारकाने सादर केलेले दावे कलम ३८ अंतर्गत सादर केले गेले आहेत असे मानले जाईल.

**दिनांकः १०.०७.२०२५**
**ठिकाण: मुंबई**

सही/-
**गौरांग छोटालाल शाह**
नियुक्त संचालक
आयबीबीआय नोंदणीः IBBI/IPA-002/IP-N00947/2019-2020/13002
एएफएः एए२/१३००२/०२/३००६२६/२०३९२७वैधता ३०.०६.२०२६ पर्यंत
मे. वॉटरफॉल इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल प्रायव्हेट लिमिटेडचे
आयबीबीआय नोंदणीः IBBI/IPE-0022/IPA-1/2022-23/50016
एएफएः एए१/५००१६/०२/३११२२५/२००४३, वैधता ३१.१२.२०२५ पर्यंत
व्हिलबेरी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेडच्या बाबतीत परिसमापक

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई**
**(म्हाडाचा घटक)**
**दुरध्वनी क्र. ०२२-२३५३१३२९ ई - मेल eed3mhada@gmail.com**
म्हाडा MHADA

**ई-निविदा नोटीस**

Main portal :https://mahatenders.gov.in MHADA portal : https://mhada.maharashtra.etenders.in

कार्यकारी अभियंता (डी-३), विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, यांचेकडून खालील दर्शविलेल्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग (महाराष्ट्र शासन), महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांचेकडे उचित वर्गात नोंदणीकृत असलेल्या ठेकेदारांकडुन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच पी.डब्लु.डी./एम.ई.एस./ एम.सी.जी.एम./ एम.एम.आर.डी.ए/सिडको / एम.जे.पी. / एम.आय.डी.सी./बी.पी.टी. आणि भारतीय रेल्वे शासकीय निमशासकीय यांचे कडे उचित वर्गात नोंदणीकृत असलेल्या ठेकेदारांकडुन ई- निविदा मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | इसारा रक्कम १ % | सुरक्षा अनामत २% (५०% सुरुवातीला व देयकातून ५०%) | नोंदणी वर्ग | निविदेची किंमत (५% GST) धरून | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इ. क्र. १२-१२ए, १२ बी,४डी बाबुलनाथ रोड मुंबई (मंडळामार्फत काम) (२री बोली) | १७२२२३९/- | १७२२२.०० | ३५०००.०० | वर्ग V-A व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळा धरुन) |

| अनु. क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्दीचा दिनांक | १४/०७/२०२५ सकाळी १०:०० वाजता |
| २ | निविदा विक्रीचा दिनांक | १४/०७/२०२५ सकाळी १०:०५ वाजता |
| ३ | निविदा विक्रीचा अंतिम दिनांक | २१/०७/२०२५ संध्या ०५:३० वाजता |
| ४ | निविदा दाखल दिनांक | १४/०७/२०२५ सकाळी १०:०५ वाजता |
| ५ | निविदा दाखल अंतिम दिनांक | २१/०७/२०२५ संध्या ०५:३० वाजता |
| ६ | तांत्रिक दस्ताऐवज निविदा उघडण्याचा दिनांक | २३/०७/२०२५ सकाळी ११:०० पासून पुढे |
| ७ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | पात्र निविदाकारास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |

१. संपूर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन (ई-टेंडरींग) पध्दतीची असेल, निविदेसंबंधी अधिसुचना, अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाची वेबसाईट https://mahatenders.gov.in यावर प्रसिध्द होईल.
२. निविदा संबंधित दस्तऐवज वेबसाईट https://mahatenders.gov.in यावर पाहून **दिनांक १४/०७/२०२५ (सकाळी १०.०५ वाजेपासून) ते दिनांक** २१/०७/२०२५ (**सायंकाळी** ५.३० **वाजेपर्यंत**) वेबसाईटवरुन डाऊनलोड करता येतील.
३. वरील निविदेचे निविदा शुल्क व इसारा रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावे लागेल. एनईएफटी / आरटीजीएस / (NEFT/RTGS) द्वारे पेंमट भरावे.
४. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर (before Executive Magistrate / Notary) कंत्राटदारास बंधनकारक करण्यात येत आहे. निविदेतील लिफाफा क्र. १ मध्ये निविदा मंजुरी व नंतर देयक अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहील. त्यास म्हाडा अधिकारी जबाबदार असणार नाहीत.
५. **तांत्रिक निविदा (Technical Bids) दिनांक** २३/०७/२०२५ **रोजी सकाळी ११.०० नंतर उघडण्यात येईल. त्यानंतर तांत्रिक** निविदेमध्ये पात्र ई - निविदाकारांचे आर्थिक बोली कार्यकारी अभियंता, डी-३ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, रजनी महल, ताडदेव, मुंबई - ४०००३४ यांचे दालनात वेबसाईट https://mahatenders.gov.in वर उघडण्यात येईल.
६. निविदाकाराने निविदा सादर करताना अपलोड केलेली सर्व मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी तांत्रिक निविदा उघडण्याच्या वेळी सादर करावीत.
७. निविदाकाराने सादर केलेली माहिती व स्कॅन केलेल्या प्रती.pdf फॉरमॅटमध्ये सादर करावी.
८. सर्व ठेकेदार (म्हाडा/सार्वजनिक बांधकाम खात्यात इतर ठिकाणी नोंदणीकृत आहेत) त्यांनी देकार सादर करताना निविदा रकमेचा २०% रकमेच्या सॉल्वनशी प्रमाणपत्राची स्कॅनप्रत अपलोड करावी.
९. निम्न स्वाक्षरीकारी हे एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा हक्क राखून ठेवत आहेत.
१०. जर निविदाकाराने कमी दराने निविदा सादर केलेली असेल तर त्यास ८ दिवसाचे कालावधीत अतिरिक्त अनामत सुरक्षा रक्कम जमा करण्यास पत्राव्दारे कळविण्यात यावे. परंतु तसे न झाल्यास जर द्वितीय निविदाकार पहिल्या निविदाकाराने भरलेल्या कमी टक्केवारीचे दराने काम करण्यास तयार असेल तर द्वितीय निविदाकाराची निविदा मंजुर करण्यात येईल. अतिरिक्त अनामत सुरक्षा रकमेबाबत सविस्तर निविदा सूचना पहावी.
११. १०% पेक्षा अधिक कमी दराच्या निविदा प्राप्त झाल्यास सदर कामाच्या निविदा पुन्हा दोन वेळ मागविण्यात याव्यात (Recall) व तिसऱ्या वेळेस जर निविदा १०% पेक्षा अधिक कमी दराची प्राप्त झाल्यास संबंधित ठेकेदारास भरावी लागणारी Performance Deposit ही कामाच्या अंतिम देयकानंतर दोन वर्षानंतर परत करण्यात यावी.
१२. निविदाकाराने निविदा संबंधीची संपूर्ण माहिती संकेतस्थळ https://mahatenders.gov.in यावरुन मिळवावी. तसेच मदतीसाठी १८००-२३३-७३१५ अथवा ईमेल eproc.support@mahatenders.gov.in येथे संपर्क करावा.

**निविदेबाबत शंका निरसनार्थ महाराष्ट्र पोर्टल यांना संपर्क साधावा.**
**दूरध्वनी क्रमांक** - १८०० ३०७०२२३२ / ०१२०-४००१००२ / ०१२०-४२०० ४६२ / ०१२०-४००१००५ /०१२०-६२७७ ७८७.

सही/-
**आर. व्ही. शिंदे**
**कार्यकारी अभियंता (डी-३)**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**

CPRO/A/569
Follow us:@mhadaofficial
**म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था**

# फ्लॅट देण्याच्या बहाण्याने फसवणूक बिल्डर दाम्पत्याविरुद्ध गुन्हा

**७४ हून अधिक ग्राहकांना कोट्यवधींचा चुना**

■ मुंबई

**सायन** कोळीवाडा येथील झोपडपट्टी पुनर्विकास (एसआरए) योजनेतील निर्माणाधीन इमारतीत दोन फ्लॅट विकत देण्याचे आश्वासन देऊन त्या बदल्यात ७२ लाख रुपये घेऊनही फ्लॅटचा ताबा न देता फसवणूक केल्याप्रकरणी झेउस हाऊसिंग आणि कन्स्ट्रक्शन लिमिटेडचा मालक आशीत बलवंत दोशी आणि त्याची पत्नी पुनम दोशी यांच्याविरोधात अँटॉप हिल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घाटकोपर येथील गारोडीया नगरात राहणारे व्यापारी कार्तीकेय जगदीश शहा यांना फ्लॅट खरेदी करावयाचा असल्याने ऑक्टोबर २०१३ मध्ये त्यांनी या दाम्पत्याची भेट घेतली. दोघांनी आपण सायन कोळीवाडा येथे झेउस रेसिडेन्सी हा एसआरए प्रकल्प राबवत असून त्यातील विक्री घटकात (सेलेबल) २१०४ या क्रमांकाचा फ्लॅट विकण्यास तयार असल्याचे सांगितले. ६०० चौ. फुटांच्या या फ्लॅटची किंमत एक कोटी ४६ लाख रुपये इतकी सांगण्यात आली होती.

शहा यांनी आणखी एक फ्लॅट विकत घ्यायचा असल्याचे सांगताच त्यांनी ९०० चौ. फुटांचा २१०२ क्रमांकाचा फ्लॅट विकत देण्याची तयारी दर्शवली. या दोन्ही फ्लॅटसाठी शहा यांनी धनादेश तसेच रोख स्वरूपात एकूण ७२ लाख रुपये आगाऊ दिले. त्याबदल्यात आरोपींनी दोन्ही फ्लॅटचे अलॉटमेंट लेटरही दिले. मात्र बारा वर्षे उलटली तरी दोन्ही फ्लॅटचा ताबा न देता आरोपींनी त्यांना वेगवेगळ्या सबबी सांगण्यास सुरुवात केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शहा यांनी या दाम्पत्याविरोधात अँटॉप हिल पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी या दांपत्यविरोधात विश्वासघात केल्याचा गुन्हा दाखल केला.

# मुरबाड तहसील कार्यालयावर कामगार संघटनांचा मोर्चा

■ मुरबाड

**श्रमसंहितांची** अंमलबजावणी करण्याच्या सरकारच्या निर्णयाच्या निषेधार्थ आज विविध कामगार संघटनांनी मुरबाड तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढला.

या श्रमसंहितांमुळे कामगारांचे कामाचे तास, किमान वेतन, सामाजिक सुरक्षा इत्यादीं बाबतचे अधिकार नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला आहे, असा कामगार संघटनांचा आक्षेप आहे. जनतेच्या लोकशाही अधिकारांवर, सरकारच्या धोरणांविरोधात आवाज उठवण्याच्या अधिकारावर, सरकारच्या जनविरोधी पावलांवर टीका करण्याच्या अधिकारावर आणि एकूणच मूलभूत मानवी अधिकारांवर गदा आणणे सहज शक्य होणार असल्याने महाराष्ट्रात फडणवीस सरकारने महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक पारित करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. कामगार, कष्टकऱ्यांचे त्यांच्या रोजीरोटीच्या प्रश्नांवरील लढे दडपण्याचेच हे कारस्थान आहे.

# संजय गायकवाडांची कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण

पान ८ वरून

करणार नाही, असे म्हटले आहे. काल रात्री गायकवाड यांनी कॅन्टीनमधून डाळ-भात आणि पोळीचे जेवण मागवले होते. मात्र त्यांना मिळालेले जेवण निकृष्ट व शिळे असल्याचा आरोप करत त्यांनी थेट कॅन्टीनमध्ये जाऊन व्यवस्थापकाला जाब विचारला. यावेळी झालेल्या वादावादीत त्यांनी कर्मचाऱ्याला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केल्याचे व्हिडिओत दिसले. याशिवाय त्यांना कोणीही बिल भरू नका, असेही तिथे असलेल्या उपस्थितांना सांगितले. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना गायकवाड म्हणाले की, पहिला घास घेतल्यानंतर मला उलटी झाली. डाळीचा वास घेतला, तर आंबट वास आला. याआधीही दोन-तीन वेळा कॅन्टीनविषयी तक्रार मिळाली होती. त्यांना समजही दिली होती. आमदार असून मला असे निकृष्ट अन्न मिळाले, तर येथे ग्रामीण भागातून येणाऱ्या सामान्य माणसांचे काय होत असेल?

अन्न व औषध प्रशासनने (एफडीआय) कॅन्टॉगमधील अन्न जप्त केले. त्यानंतर संध्याकाळी उपहारगृहाच परवाना रद्द करण्याची कारवाई केली. या कॅन्टीन व्यवस्थापकाचे मनोरा आमदार निवासातील कंत्राट काढून घेतल्यानंतर त्याला आकाशवाणी आमदार निवासाचे कंत्राट दिले होते. त्याचे हेही कंत्राट २०१८ मध्ये संपले असून याठिकाणी बेकायदेशीरपणे कॅन्टीन चालवत असल्याची माहिती आहे. मात्र, मारहाण प्रकरणाला कलाटणी देण्यासाठी ही माहिती उघड करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असेही म्हटले जात आहे.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

**रवाते - जल अभियंता विभाग**

**क्र. कार्य. अभि.(परि.)ज.मा.का./२१३९/दि. ८/७/२५**

**ई-निविदा सुचना**

बृहन्मुंबई महानगरपालिकेव्दारे खालील नमुद विषयांकित कामांसाठी, इच्छुक निविदाकारांकडुन ऑनलाईन ई- निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा वितरण व विक्री दिनांक आणि वेळ, निविदा विक्री नियत दिनांक आणि वेळ या बाबतचा तपशीलवार बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेबसाईट अर्थात http://portal.mcgm.gov.in वर आणि महाटेंडर संकेतस्थळावर अर्थात http://mahatenders.gov.in निविदा अवलोकन अंतर्गत प्रसिद्ध / अपलोड करण्यात आली आहे.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | निविदेचा विषय |
|---|---|---|
| १. | २०२५_एमसीजीएम_११९८१९७_१ | सहायक अभियंता (परि.) जलकामे शहर विभागांतर्गत विविध जलबोगद्यांच्या आउटलेट्स परिसरात जीआरपी गेट्स आणि स्टेयरकेस डिझाइन, पुरवठा, फॅब्रिकेशन आणि स्थापना करणेबाबत. (निविदा जारी दि. १०.०७.२०२५) |

इच्छुक निविदाकारांनी तपशीलवार माहितीकरिता महाटेंडर संकेतस्थळावर अर्थात http://mahatenders.gov.in आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेबसाईट अर्थात http://portal.mcgm.gov.in वर भेट द्यावी.

सही/-
कार्य. अभि. (परि.) ज. मा. का.

पीआरओ/९४१/जाहि./२०२५-२६

**कोणताही ताप असू शकतो हिवताप.**


# गोंदियात सहा महिन्यांतच महामार्गाला मोठ्या भेगा

■ गोंदिया

**गोंदिया** जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वरील अवघ्या सहा महिन्यांपूर्वी बांधलेला उड्डाण पूल पहिल्याच पावसात खचल्याने कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

देवरी तालुक्यातील मरामजोब-मासूलकसा घाट परिसरात वन्यजीव संरक्षणासाठी उभारण्यात आलेल्या या उड्डाण पुलाचे बांधकाम अवघ्या सहा महिन्यांपूर्वीच पूर्ण झाले होते. मात्र, कालपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पुलाची एक बाजू पूर्णतः खचली असून, रस्त्यावर मोठमोठ्या भेगा पडल्या आहेत. यामुळे वाहनधारकांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. या पुलाचे कंत्राट अग्रवाल ग्लोबल कंपनीकडे होते. जवळपास पाच वर्षे चाललेले हे बांधकाम पूर्ण होताच त्यावरून जडवाहतूक सुरू झाली होती. मात्र पहिल्याच पावसात उड्डाण पुलाची दुर्दशा झाली. या दुर्घटनेने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या जिल्ह्यातील आणखी काही प्रकल्पांच्या बांधकामांच्या दर्जावर पुन्हा एका शंका घेतली जात आहे. या आधी नागपूर-हैदराबाद महामार्गावरील बुटीबोरी उड्डाण पूल साडेतीन वर्षांत खचला होता, तर मानकापूर उड्डाण पूल दोन वेळा खचला होता.



# वैद्यकीय प्रतिपूर्ती योजनेत पारदर्शकता आणणार! आशिष शेलारांची माहिती

■ मुंबई

**शासकीय** कर्मचाऱ्यांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या वैद्यकीय प्रतिपुर्ती योजनेची प्रक्रिया ऑनलाईन व पारदर्शक पध्दतीने होईल यासाठी शासन आवश्यक त्या उपाययोजना करेल. तसेच हरियाणा व अन्य राज्यात राबवण्यात येणाऱ्या कॅशलेस योजनेचाही अभ्यास करणार असल्याची माहिती मंत्री आशिष शेलार यांनी आज विधान परिषदेत दिली. आमदार सत्यजित तांबे यांनी शासकीय कर्मचाऱ्यांची वैद्यकीय योजनेबाबत लक्षवेधी सूचना विधान परिषदेत उपस्थित केली होती. या लक्षवेधीला मुख्यमंत्र्यांच्या वतीने सामान्य प्रशासन विभागातर्फे मंत्री शेलार यांनी उत्तर दिले.

ते म्हणाले की, सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे एकत्रित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत लाभार्थी कुटुंबांना प्रति कुटुंब प्रतिवर्ष रुपये ५ लाख रुपये किंमतीचे आरोग्य संरक्षण पुरविण्यात येते. ही योजना कॅशलेस आहे. सदर योजनेतील गट ब मध्ये शुभ्र पत्रिका धारक कुटुंबे (शासकीय निम शासकीय कर्मचाऱ्यांसह) कोणत्याही प्रकारचे शिधापत्रक धारक नसलेली कुटुंबे यामध्ये राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. अंगीकृत २१८४ रुग्णालयांमध्ये वैद्यकीय उपचारांना लाभ अनुज्ञेय आहे.

सदर योजनेमध्ये २०२०-२१ १ पासून आतापर्यंत एकूण ३७ लाख ६२ हजार ६०१ प्रकरणांमध्ये ६,९५८.२ कोटी इतका खर्च झालेला आहे. या शिवाय वैद्यकीय प्रतिपुर्ती योजनेत सन २०१७ ते २०२२ या पाच वर्षात शासनाने अनुक्रमे २३८.१३ कोटी, २४८.३२ कोटी, २१३.८६ कोटी, २२६.४७ कोटी, आणि ३४६.१३ कोटी एवढा खर्च करण्यात आला आहे.


**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**GSTAAD HOTELS PRIVATE LIMITEDच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | GSTAAD HOTELS PRIVATE LIMITED |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | १० डिसेंबर, २००३ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U55101MH2003PTC143481 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ४ था मजला, रहेजा चेंबर्स, लिंकिंग रोड आणि मेन ॲव्हेन्यू, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५४. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | ०८ जुलै, २०२५ |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | ०४ जानेवारी, २०२६ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | **नाव**: जयेश नटवरलाल संघराजका नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P00216/2017-2018/10416 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | **नोंदणीकृत पत्ता**: ४०५-४०७, हिंद राजस्थान बिल्डींग, डी. एस. फाळके रोड, दादर पूर्व, मुंबई ४०००१४. **ईमेल आयडी**: jayesh.sanghrajka@incorpadvisory.in |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | **पत्रव्यवहाराचा पत्ता**: इनकॉर्प रिस्ट्रक्चरिंग सर्व्हिसेस एलएलपी ४०५-४०७, हिंद राजस्थान बिल्डींग, डी. एस. फाळके रोड, दादर पूर्व, मुंबई ४०००१४. पत्रव्यवहाराचा ईमेल आयडी: cirp.gstaad1@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | २२ जुलै, २०२५ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही |
| १३. | वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल : | अ) दावा अर्ज डाऊनलोड करण्याकरिता वेब लिंक https://ibbi.gov.in/en/home/downloads ब) लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी आदेश क्र. सीपी (आयबी) क्र. २९१/एमबी/२०२३ नुसार **दिनांक ८ जुलै, २०२५ रोजी GSTAAD HOTELS PRIVATE LIMITED**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

**GSTAAD HOTELS PRIVATE LIMITED**च्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. २२ जुलै, २०२५** रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

**दिनांक: १० जुलै, २०२५** **जयेश नटवरलाल संघराजका**
**ठिकाण: मुंबई** **GSTAAD HOTELS PVT. LTD.च्या प्रकरणात अंतरिम ठराव व्यावसायिक**
नोंदणी क्रमांक: IBBI/IPA-001/IP-P00216/2017-2018/10416
एएफए क्र. AA1/10416/02/311225/107388 दि. ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत वैध


# भारतीय परिचारिकेला येमेनमध्ये १६ जुलै रोजी फाशी देणार

■ येमेन

**भारतीय** परिचारिका निमिषा प्रिया हिला येमेनमध्ये १६ जुलै रोजी फाशी देणार आहेत. २०१७ साली येमेनचे नागरिक तालाल अब्दो मेहदी यांच्या हत्येप्रकरणी निमिषाला ही मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली होती.

निमिषा मूळची केरळच्या पलक्कड जिल्ह्यातील रहिवासी आहे. ती २००८ साली येमेनमध्ये स्थलांतरित झाली होती. तिथे तिने काही रुग्णालयांमध्ये काम केल्यानंतर २०१५ साली तिने स्वतःचा दवाखाना सुरू केला. स्थानिक कायद्यानुसार, तिने दवाखाना चालवण्यासाठी मेहदी यांना भागीदार म्हणून ठेवले होते.

निमिषाने मेहदी यांनी तिचीआर्थिक फसवणूक केल्याचा आरोप केला. एवढेच नव्हे तर त्यांच्याकडून आपला पासपोर्ट परत घेण्यासाठी तिने त्यांना एक इंजेक्शन दिले. हे इंजेक्शन तिने केवळ बेशुद्ध करण्याच्या हेतूने दिले असले तरी त्यात त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर निमिषा पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना तिला पोलिसांनी अटक केली. ३० डिसेंबर २०२४ रोजी येमेनचे राष्ट्रपती राशाद अल-अलिमी यांनी तिच्या मृत्युदंडाला अंतिम मंजुरी दिली होती.



दरम्यान, येमेनमधील तुरुंग प्रशासनाने अधिकृतरित्या फाशीची तारीख जाहीर करून याबाबत निमिषाला त्याबाबत कळवले आहे. मात्र मेहदी यांचे कुटुंब निमिषाला माफ करत असेल आणि नुकसानभरपाई स्वीकारत असेल तर फाशी टाळता येईल. मेहदी यांच्या कुटुंबाला सुमारे ८ कोटी रुपयांची (१० लाख अमेरिकन डॉलर) ऑफर देण्यात आली आहे. मात्र, मेहदी कुटुंबाने अद्याप ही ऑफर स्वीकारलेली नाही, असे सेव्ह निमिषा प्रिया क्शन कौन्सिलचे सदस्य आणि मानवाधिकार कार्यकर्ते सॅम्युअल जेरोम यांनी म्हटले. तसेच निमिषाची आई प्रेमा कुमारी गेल्या वर्षभरापासून येमेनमध्ये असून त्या आपल्या मुलीला वाचवण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे सेव्ह निमिषा प्रिया समितीचे सदस्य बाबू जॉन यांनी सांगितले.

# कोलकाता सामूहिक बलात्कार ४ आरोपींना १४ दिवसांची कोठडी

■ कोलकाता

**कोलकात्याच्या** कसबा परिसरात २५ जून रोजी लॉ कॉलेजमधील एका विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार झाला. या प्रकरणातील मुख्य आरोपी मनोजित मिश्रा, झैब अहमद व प्रमीत मुखर्जी व पिनाकी यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

या प्रकरणातील मुख्य आरोपी मनोजित मिश्रा या आधीच कोठडीत होता. या प्रकरणाला राजकीय रंग देण्यात येत असल्याने या प्रकरणी दाखल झालेल्या जनहित याचिकांवरच्या सुनावणी दरम्यान न्यायालयाने पश्चिम बंगालमधील सर्व महाविद्यालये व विद्यापीठांतील विद्यार्थी संघटनांची कार्यालये बंद करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी मनोजित हा कलकत्ता लॉ कॉलेजच्या विद्यार्थी संघटनेच्या नावाखाली अनेक उपक्रम राबवत होता. त्यामुळे या संघटनांची कार्यालये बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हे आरोपी तपास चुकीच्या दिशेने व्हावा म्हणून वेगवेगळी माहिती देत असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

# बेळगावात एकाच कुटुंबातील चौघांचा आत्महत्येचा प्रयत्न

■ बेळगाव

**बेळगाव** शहरातील जोशीमाळ परिसरात एका कुटुंबातील चौघांनी विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत तिघांचा मृत्यू झाला असून, एका महिलेची प्रकृती अत्यवस्थ आहे. संतोष कुराडेकर (४४), सुवर्णा कुराडेकर आणि मंगला कुराडेकर अशी मृतांची नावेअसून, सुनंदा कुराडेकर यांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# विदर्भात पावसाचा कहर नागपुरात सर्वाधिक पाऊस

■ नागपूर

**विदर्भात** पावसाने थैमान घातले असून अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. नागपूरमध्ये सर्वाधिक पाऊस झाला आहे. त्यामुळे अनेक भागांत गेले ४८ तास पाणी साचले आहे.

भंडाऱ्यात गेल्या २४ तासांत शंभरहून अधिक मिमी पावसाची नोंद झाली आहे. नागपूर, वर्धा जिल्ह्यातील शाळांना मुसळधार पावसामुळे आज सुट्टी जाहीर करण्यात आली. नागपुरात आतापर्यंत २६३ मिमी म्हणजे ७२ टक्के पाऊस झाला आहे.

विदर्भातील ४५ तालुक्यांत अतिवृष्टीची नोंद झाली असून त्यात नागपूर जिल्ह्यातील १३, वर्धा जिल्ह्यातील ८, भंडारा जिल्ह्यातील ७, गडचिरोली जिल्ह्यातील ६, चंद्रपूर जिल्ह्यातील पाच आणि गोंदिया जिल्ह्यातील तीन तालुक्यांचा समावेश आहे. नागपूर जिल्ह्यात गेले ६० तास मुसळधार पाऊस सुरू असून हवामान विभागाने यलो अलर्ट दिला आहे. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ चमू सज्ज ठेवण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

नागपूरचा प्रमुख मार्गअसलेल्या रिंग रोडवरील पडोळे चौकपासून सुमारे पाऊण किलोमीटर अंतरापर्यंत रस्ता पूर्णपणे जलमय झाला होता. त्यामुळे वाहतूक दुसऱ्या बाजूने वळवावी लागली. पडोळे चौक ते राधे मंगलम कार्यालय दरम्यान रिंग रोडची एक बाजू पूर्णपणे जलमय झाली असून त्या बाजूची वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली होती.


**जाहीर नोटीस**

जाहीर नोटीस द्वारा कळविण्यात येत आहे की फ्लॅट क्रमांक २०८, २रा मजला, चांचल टॉवर बी कॉ. ऑप. हौ. सोसा. लि, ५५० चौ. फु. (सुपर बिल्ट- अप) मोजमापाने, गाव माणिकपूर, आनंद नगर, वसई रोड (प), ता. वसई, जि. पालघर, पत्त्यावर सर्वे नं. ९७अ, हिस्सा नं. ३ (भाग) शेअर्स सर्टिफिकेट १६ डिस्टिंटिव्ह ७६ ते ८० (दोन्ही समाविष्ठ) पाच भागांसह खरेदी करण्यात आलेला आहे, घराचा कर क्रमांक VN१९ / ३५२४३ आहे, श्री. प्रतापराय मनुभाई शेठ यांनी ०९/०३/१९८७ रोजी श्री. एव्हरेडी कन्स्ट्रक्शन कडून करारान्वये खरेदी केला होता. श्री. प्रतापराय मनुभाई शेठ तिथी १०/०७/२००० रोजी आणि त्यांच्या पत्नी श्रीमती सरोज प्रतापराय शेठ तिथी २२.०५.२०२३ रोजी अनियोजित निधन झाल्या, त्यांच्या मागे १) हितेश प्रतापराय शेठ २) हरेश प्रतापराय शेठ, आणि ३) जगदीश प्रतापराय शेठ या तीन कायदा वारस म्हणून राहिला. १) हितेश प्रतापराय शेठ २) हरेश प्रतापराय शेठ,आणि ३) जगदीश प्रतापराय शेठ यांनी चंचल टॉवर बी कॉ. ऑप. हौ. सोसा. लि, कडे वरील नमुद करण्यात आलेल्या २०८ क्रमांकाच्या फ्लॅट मध्ये श्रीमती सरोज प्रतापराय शेठ आणि स्व. श्री प्रतापराय एम. शेठ यांच्या सर्व हक्क आणि शेअर्स हितेश प्रतापराय शेठ यांच्या नावे हस्तांतरित करण्यासाठी संपर्क साधून त्यांचा नाव नोंदविला आहे. १) हितेश प्रतापराय शेठ हे २) हरेश प्रतापराय शेठ,आणि ३) जगदीश प्रतापराय शेठ ह्यांचा सहमतीने सदर फ्लॅटची विक्री श्री. राजेंद्रप्रसाद श्रीनाथ जैसवाल आणि श्रीमती हेमलता राजेंद्रप्रसाद जैसवाल ह्यांना करण्याची मनसा आहे, म्हणून ह्या सार्वजनिक नोटीसद्वारे कोणत्याही अडचणींवर विचार करण्यास आमंत्रित केले जाते. सदर फ्लॅट वा त्याच्या कोणत्याही भागामध्ये विक्री, भेट, भाडे, वारसा, बदल, गहाण, चार्ज, विश्वास, ताबा, उपयोग, अटॅचमेंट किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाने स्वारस्य सांगणाऱ्या सर्व व्यक्तींनी त्यांचा दाव्याचे दस्तऐवज पुरावा सह ह्या खालील स्वाक्षरी करणाऱ्याला प्रत्यक्ष कार्यालयात एडवोकेट वि. बी. शुक्ला, पहिला मजला, रिलायबल प्रेस्टिज, आचोले रोड, नालासोपारा (प), ता. वसई, जि. पालघर ४०१२०९ येथे, या तारखेनंतर १५ दिवसांच्या आत माहिती देणे अनिवार्य आहे, अन्यथा अन्यथा तसे कुठल्याही हरकती न आल्यास पुढच्या व्यवहार करतील हितेश प्रतापराय शेठ फ्लॅटला विकण्याचे आणि त्यातली मालकी वापरण्याचे सर्व अधिकार मिळतील, हे कोणत्याही दाव्याबद्दल संदर्भ न देता, आणि तसे असल्यास, ते मानले जाईल की सोडले गेले आहे.

सही/-
एडवोकेट वि. बी. शुक्ला



## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

**मध्य मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग, सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई - ४०००१८.**
**दुरध्वनी क्र.** ०२२-२४९२४३४९, **ई-मेल : elcentralmumbai.ee@mahapwd.gov.in**

**ई-निविदा सुचना क्र. २२ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग वरळी मुंबई, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खालील कामाकरिता बी १ टक्केवारी नमुन्यातील निविदा ई - निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता मध्य मुंबई विद्युत विभाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा रक्कम अक्षरी |
|---|---|---|---|
| 1. | H11169/2024-25, Providing renovation, additions and alterations in El due Civilrepairs and renovation works in HIV Lab near Ortho OT at 6th floor Main Hospital Bldg Sir J. J. Group of Hospitals compound, Byculla, Mumbai. | 2475231 | चोवीस लाख पंच्याहत्तर हजार दोनशे एकतीस |
| 2. | W21104/25-26 Providing replacement of switchgears, passage lights, meter box, service cable etc at BDD chawl no 45 at Worli Mumbai. | 1005339 | दहा लाख पाच हजार तीनशे एकोणचाळीस |
| 3. | H11186 of 2024-25 Providing Special Repairs to 5 nos. x 11 TR capacity Air-Cooled Packaged Type A.C. units installed in C.J. (Ophthalmic) OT at C. J. Bldg., Sir J. J. Group of Hospitals compound, Byculla, Mumbai. | 1603938 | सोळा लाख तीन हजार नऊशे अडतीस |
| 4. | H15209 of 2024-25 Providing fully comprehensive maintenance contract of 80 HP capacity M/s. Toshiba make VRF & System installed for ward no 25 at 4th floor, Main Hospital Bldg., Sir J. J. Group of Hospitals Compound, Byculla, Mumbai. (for 3 Years) | 2224800 | बावीस लाख चोवीस हजार आठशे |
| 5. | H33001 OF 2024-25 Providing Special repairs to package type Air Conditioning Unit installed at GST Bhavan, Mazgaon, Mumbai. | 1719785 | सतरा लाख एकोणीस हजार सातशे पंच्याऐंशी |
| 6. | D11007/2025-26 : Providing supply, installation, testing & amp; commissioning of DG Set as backup power supply and & compound lighting at Detention Center Bhoiwada (G+2 FL Building ), at Bhoiwada, Mumbai. (3rd call ) | 1447267 | चौदा लाख सत्तेचाळीस हजार दोनशे सदुसष्ठ |
| 7. | Est. No. D21010/2025-26 Providing rectification to existing Fire Fighting Pump Room and accessories at PL Deshpande Kala Akadami, Prabhadevi, Mumbai. (2nd call ) | 5507767 | पंचावन्न लाख सात हजार सातशे सदुसष्ट |

१. वरील अंदाजित रकमेत जी. एस. टी. समाविष्ठ नमून ठेकेदारानी निविदेत दर भरताना जी. एस. टी. वगळून दर नमुद करावा. अंदाजित रकमेवर नमुद केलेल्या दरानुसार आलेल्या रकमेवर जी. एस. टी. १८ टक्के पर्यंत वेगळा अदा करण्यात येईल.
२. ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि. १०.०७.२०२५ ते दि. १७.०७.२०२५ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत.
३. ई निविदा उघडणे : दि. २१.०७.२०२५ रोजी सकाळी ११.०० नंतर

जा.क. काअ/ममुंविवि/निविदा/२३२२/२०२५
दिनांक : ०४/०७/२०२५

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**मध्य मुंबई विद्युत विभाग,**
**सा. बां. विभाग, वरळी, मुंबई -१८.**

क्रमांकःआरओसी-२०२५-२६/क्र-५/C१५९०



**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**निओ कॅप्रिकॉन प्लाझा प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | **निओ कॅप्रिकॉन प्लाझा प्रायव्हेट लिमिटेड** |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | १२ जानेवारी, २००४ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U55102MH2004PTC187649 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | रहेजा चेंबर्स, ४ था मजला, लिंकिंग रोड आणि मेन ॲव्हेन्यू, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५४. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | ०८ जुलै, २०२५ |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | ०४ जानेवारी, २०२६ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | **नाव**: जयेश नटवरलाल संघराजका नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P00216/2017-2018/10416 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | **नोंदणीकृत पत्ता**: ४०५-४०७, हिंद राजस्थान बिल्डींग, डी. एस. फाळके रोड, दादर पूर्व, मुंबई ४०००१४. **ईमेल आयडी**: jayesh.sanghrajka@incorpadvisory.in |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | **पत्रव्यवहाराचा पत्ता**: **इनकॉर्प रिस्ट्रक्चरिंग सर्व्हिसेस एलएलपी** ४०५-४०७, हिंद राजस्थान बिल्डींग, डी. एस. फाळके रोड, दादर पूर्व, मुंबई ४०००१४. पत्रव्यवहाराचा ईमेल आयडी: cirp.neocapricorn@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | २२ जुलै, २०२५ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही |
| १३. | वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल : | अ) दावा अर्ज डाऊनलोड करण्याकरिता वेब लिंक https://ibbi.gov.in/en/home/downloads ब) लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, **राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ** यांनी **आदेश क्र. सीपी (आयबी) क्र. २९०/एमबी/२०२३ नुसार दिनांक ८ जुलै, २०२५ रोजी निओ कॅप्रिकॉन प्लाझा प्रायव्हेट लिमिटेड**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

**निओ कॅप्रिकॉन प्लाझा प्रायव्हेट लिमिटेड**च्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. २२ जुलै, २०२५** रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

***दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.***

**दिनांक: १० जुलै, २०२५** **जयेश नटवरलाल संघराजका**
**ठिकाण: मुंबई** **निओ कॅप्रिकॉन प्लाझा प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात अंतरिम ठराव व्यावसायिक**
**नोंदणी क्रमांक: IBBI/IPA-001/IP-P00216/2017-2018/10416**
**एएफए क्र. AA1/10416/02/311225/107388 दि. ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत वैध**



IDBI BANK
CIN: L65190MH2004GOI148838

**आयडीबीआय बँक लि.**, एनपीए व्यवस्थापन गट - आयडीबीआय टॉवर, वर्ल्ड ट्रेड संकुल, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

**जोडपत्र IV,**
**[नियम ८(१)]**
**ताबा सूचना**
**(स्थावर मालमत्तेकरिता)**

ज्याअर्थी, आयडीबीआय बँक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ (२००२ चा ५४) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३(१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन कर्जदार कंपनी स्किल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड [सी.पी.(आयबी) ८३४/एमबी/२०२० मधील माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ-IVच्या आदेश दिनांक ०१.०२.२०२४ नुसार कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रियेअंतर्गत] आणि गहाणवटदार (१) मेट्रोटेक टेक्नोलॉजी पार्क प्रायव्हेट लिमिटेड, (२) स्किल हिमाचल इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड टुरिझम लि., (३) महाकालेश्वर नॉलेज इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड दिनांक ०६ जुलै, २०१८ रोजी मागणी सूचना पारित करुन व त्याची प्रत श्री. निखिल गांधी आणि श्री. भावेश गांधी यांना पाठवून सूचनेमध्ये उल्लेखिलेली रक्कम रु. ४१,३५,९४,२१४.७८ (रुपये एक्केचाळीस कोटी पस्तीस लाख चौऱ्याण्णव हजार दोनशे चौदा व पैसे अठ्ठ्याहत्तर मात्र) त्यावरील ०१ जुलै, २०१८ रोजीपासून परताव्या पर्यंतचे लागू व्याज दर आणि इतर प्रभार सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत परतावा करण्याची मागणी केली होती.

कर्जदार सदर रक्कमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ८ सह वाचावयाच्या कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून दि. ४ जुलै, २०२५ रोजी ताबा घेतला आहे.

विशेषतः गहाणवटदार, मेट्रोटेक टेक्नोलॉजी पार्क प्रायव्हेट लिमिटेड आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, मालमत्तांबाबत व्यवहार करु नये आणि मालमत्तांबाबत कोणताही व्यवहार हा आयडीबीआय बँक लिमिटेडच्या रु. ४१,३५,९४,२१४.७८ (रुपये एक्केचाळीस कोटी पस्तीस लाख चौऱ्याण्णव हजार दोनशे चौदा व पैसे अठ्ठ्याहत्तर मात्र) त्यावरील ०१ जुलै, २०१८ रोजीपासून परताव्या पर्यंतचे लागू व्याज दर आणि इतर प्रभार या रकमेकरिता प्रभाराच्या अधीन असेल.

तारण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप कलम (८) च्या तरतुदींकडे गहाणवटदार/मेट्रोटेक टेक्नोलॉजी पार्क प्रायव्हेट लिमिटेडाचे लक्ष वेधण्यात येत आहे.


**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

हिमाचल प्रदेश राज्यामधील मोहाल/मौझा कर्याल, परगणा कलहल्टी, तहसिल आणि जिल्हा शिमला येथे स्थित खाता खतोनी क्र. ३/७ ते ९ आणि ४/१० ते ११ (नवीन खाता खतनी क्र. ६/७, ८/१० आणि ९/११), खसरा क्र. १९, १९/१, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ५६, ६३, ६४, ७२, ७३, ७९, ८०, ८१, १६, १७, १८, ५९, २४, २८, ३०, ३३, ३५, ३६, ३७, ५८, ५७ किता २८ धारण केलेली जमीन एकूण मोजमाप १-८५-३४ हेक्टर समाविष्ट असलेल्या मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे आणि चतुःसीमाः

उत्तरेस किंवा त्या दिशेनेः रिक्त जमीन आणि जंगल
दक्षिणेस किंवा त्या दिशेनेः रिक्त जमीन
पूर्वेस किंवा त्या दिशेनेः जंगल
पश्चिमेस किंवा त्या दिशेनेः जंगल
व त्यासह त्यावरील सर्व इमारती आणि संरचना आणि जमिनीस संलग्न किंवा जमिनीस संलग्न असलेल्या कशासही कायमस्वरुपी बसविलेल्या सर्व प्लान्ट आणि मशिनरी.

दिनांकः ०४ जुलै, २०२५ प्राधिकृत अधिकारी
ठिकाणः शिमला, हिमाचल प्रदेश आयडीबीआय बँक लिमिटेड





## लाडक्या राहासाठी धावला रणबीर...

**सुपरस्टार** रणबीर कपूर सध्या आपल्या आगामी बहुचर्चित चित्रपट 'रामायण' मुळे सोशल मीडियावर बातम्यांचा विषय बनला आहे. हा सिनेमा पुढील वर्षी प्रदर्शित होणार आहे. याच दरम्यान, रणबीरसह या सिनेमामध्ये काम करणाऱ्या त्याच्या सहअभिनेत्रीने रणबीर प्रत्यक्ष आयुष्यात कसा आहे हे सांगितले आहे. 'रामायण' मध्ये प्रभु श्रीरामाची भूमिका करत असलेल्या रणबीर कपूरच्या आईची–कौशल्याची भूमिका अभिनेत्री इंदिरा कृष्णन करत आहे. रणबीर कपूरविषयी बोलताना इंदिरा कृष्णनने सांगितले की, रणबीर माझा आवडता सहकलाकार आहे. तो पूर्ण प्रयत्न करतो की, मी सेटवर सहजपणे वावरू शकेन. इतका मोठा सुपरस्टार असूनसुद्धा रणबीर अतिशय नम्र आणि साधा अभिनेता आहे. इंदिराने रणबीरचा एक मजेदार किस्सा देखील शेअर केला. तिने सांगितले की, एक दिवस तो लंगडत सेटवर आला तेव्हा सर्वांना काळजी वाटली की, काय झाले. जेव्हा मी त्याला याविषयी विचारले, तेव्हा रणबीरने सांगितले की, 'एक स्पर्धा होती इंदिरा जी... मी राहासाठी धावत होतो. आणि मी पहिला आलो.' इंदिरा म्हणते की, रणबीर एक आदर्श पिता आहे.

## कार्तिकचा सिनेमा कधी प्रदर्शित?

**हिंदी** चित्रपटसृष्टीतील नामवंत दिग्दर्शक म्हणून अनुराग बासू यांच्याकडे पाहिले जाते. सध्या त्यांचा 'मेट्रो इन दिनो' हा सिनेमा प्रदर्शित झाला आहे व त्यात आदित्य रॉय कपूर, सारा अली खान, कोंकणा सेन, पंकज त्रिपाठी, अनुपम खेर आदि अनेक कलाकार आहेत. वाचकांना माहिती असेलच की, स्टार अभिनेता कार्तिक आर्यन व दाक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीला घेऊन अनुराग बासू चित्रपट बनवत होते. त्या सिनेमाचे सद्य शीर्षक 'आशिकी ३' असले तरी ते लवकरच बदलले जाण्याची शक्यता आहे. या सिनेमाचे शूटिंग पूर्ण झाले असून त्याच्या पोस्ट प्रॉडक्शनवर काम सुरु आहे. आता या चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत एक बातमी समोर आली आहे की, हा चित्रपट येत्या दिवाळीला प्रदर्शित करण्यात येणार आहे.



## करीनाचा जलवा

अभिनेत्री करीना कपूर आपल्या सिनेमांपेक्षा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे अधिक चर्चेत असते. सध्या करीना आपल्या कुटुंबासह सुट्टीची मजा घेत आहे. उत्तम ड्रेसिंग सेन्स असलेल्या करीनाने आपले नवीन फोटो इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर केले आहेत. त्यात करीना स्विमिंग सूटमध्ये दिसत आहे. बेबो म्हणून चित्रपटसृष्टीत नामवंत असलेल्या करीनाने बॉडीकॉन स्विमिंग सूट परिधान करून फोटोशूट केले आहे. त्यात तिने डोळ्यांवर काळा चष्मा आणि डोक्यावर टोपी घातली आहे. या फोटोंखाली तिने लिहिले आहे की, 'बीचवर कॅण्डिड होणे माझ्याकडून शिक बेबी.' करीनाचे हे फोटो सोशल मीडियावर खूप व्हायरल झाले आहेत. तिचे फॉलोअर्स देखील भरपूर आहेत. तिच्या या फोटोंवर चाहत्यांखेरीज फॅशन डिझाइनर मनीष मल्होत्रा आणि अनेक चित्रपट कलाकारांनी रेड हार्ट इमोजी पोस्ट केला आहे. तर चाहते करीनाच्या लूकची प्रशंसा करत लांबलचक कॉमेंट्स करत आहेत.







## मधुर घेऊन येत आहे 'द वाईव्स'

**चित्रपटसृष्टीतील** स्टार्सच्या पत्नींचे आयुष्य पाहून सर्वसामान्य प्रेक्षकांना वाटत असते की असं आयुष्य आपल्याला देखील जगता आलं पाहिजे. मोठ्या स्टार्सच्या पत्नींच्या आलिशान, श्रीमंतीने भरलेल्या कथा निर्माता–दिग्दर्शक करण जौहरच्या नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या 'फॅब्युलस लाइफ ऑफ बॉलीवूड वाईव्ज' या सीरिजमध्ये प्रेक्षकांना पहायला मिळाल्या आहेत. परंतु त्यामध्ये त्यांच्या आयुष्याची काळी बाजू दाखवण्यात आलेली नव्हती. अनेक स्टार्सच्या पत्नींचे कुणाशी प्रेमसंबंध आहेत, कोणा पती–पत्नीत भांडणे होत आहेत याविषयी चित्रपटसृष्टीमध्ये दबक्या आवाजात कुजबुज असली तरी कुणीही याविषयी स्पष्टपणे बोलणे टाळतात. आता स्टार्सच्या पत्नींच्या आयुष्यातील लोकांसमोर न आलेले सत्य, त्यांची खरी–खोटी प्रेमप्रकरणं, भांडणं हे दाखवण्याची जबाबदारी दिग्दर्शक मधुर भांडारकर यांनी घेतली आहे. 'चांदनी बार', 'पेज थ्री', 'फॅशन' या चित्रपटांचे दिग्दर्शक मधुर आता या विषयावर आपला आगामी सिनेमा 'द वाईव्स' बनवत आहेत. मौनी रॉय, राहुल भट्ट, सौरभ सचदेव, अर्जुन बावेजा, सोनाली कुलकर्णी आदि कलाकार असलेल्या या चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात झाली आहे.



## १७ फ्लॉप चित्रपटांच्या अभिनेत्याचा सिक्वेल

**बॉलीवूडमधील** अभिनेता आफताब शिवदासानी अशा एका सिनेमाचा सिक्वेल घेऊन येत आहे, जो चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला होता. आपल्या अभिनय कारकिर्दीत आफताबच्या यशस्वी सिनेमांपेक्षा अयशस्वी चित्रपटांची यादी अधिक मोठी आहे. गेली २६ वर्षे तो या क्षेत्रामध्ये काम करत आहे आणि त्याने आतापर्यंत १७ फ्लॉप चित्रपट दिले आहेत. बालकलाकार म्हणून आफताबने अनेक चित्रपट आणि जाहिरातींसाठी काम केले आहे. आता आफताब आपल्या एका फ्लॉप सिनेमाच्या सिक्वेलमध्ये काम करत आहे. दिग्दर्शक इंद्र कुमार यांनी २००४ मध्ये 'मस्ती' नावाचा एक चित्रपट बनवला होता, ज्यामध्ये अभिनेता आफताब शिवदासानीसह विवेक ओबेरॉय, रितेश देशमुख आणि अजय देवगणदेखील होते. हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर यशस्वी झाला होता. त्यानंतर २०१३ मध्ये 'ग्रँड मस्ती' नावाने या सिनेमाचा सिक्वेल बनवण्यात आला होता, आणि तो देखील यशस्वी ठरला होता. परंतु त्यानंतर २०१६ मध्ये बनवलेल्या 'ग्रेट ग्रँड मस्ती' नावाने जेव्हा सिनेमाचा तिसरा भाग आला, तेव्हा तो सपशेल आपटला होता. आता या सिनेमाचा चौथा भाग बनवला जात आहे, आणि त्याचे शीर्षक ठेवण्यात आले आहे 'मस्ती ४'. या चित्रपटामध्ये पुन्हा एकदा आफताब शिवदासानी, विवेक ओबेरॉय आणि रितेश देशमुख आहेत. मात्र या चित्रपटाचे दिग्दर्शक इंद्र कुमार नव्हे, तर मिलाप मिलन जावेरी असणार आहेत. मिलापने यापूर्वी 'सत्यमेव जयते' आणि 'मरजावां' या सिनेमांचे दिग्दर्शन केले आहे. सध्या 'मस्ती ४' चे शूटिंग सुरु आहे, आणि २०२६ मध्ये हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे.

## मी वेश्या आहे हे उघड सांगणारी अँजेलू

**माया अँजेलू कधी काळी एका वेश्यागृहात काम करत होती. ही गोष्ट वादग्रस्त नाही. कारण हा तिच्या आयुष्याचा एक अध्याय आहे जो ती उघडपणे जगली. तेव्हा ती केवळ १७ वर्षांची होती. पदरात मूलही होते. बाप निघून गेला होता. एकटी आई आणि मनाने दुखावलेली स्त्री अशी तिची अवस्था होती. समाजाने तिला कोणताही मार्ग दाखवला नाही, म्हणून तिने स्वतःच मार्ग शोधून काढला.**



अमेरिकेची प्रसिद्ध कवयित्री व लेखिका

अमेरिकेची प्रसिद्ध कवयित्री होण्यापूर्वी, सन्माननीय पदव्या मिळण्यापूर्वी आणि प्रसिद्ध मुलाखतकार ओप्रा विन्फ्रेच्या सोफ्यावर मुलाखत देण्यासाठी बसण्यापूर्वी माया अँजेलूचे जीवन संघर्षमय होते.

ती स्ट्रिप क्लबमध्ये नाचायची, असभ्य ठिकाणी कॅलीप्सो गाणे गायची, तिने स्वयंपाकी, ट्राम कंडक्टर आणि वेश्या म्हणूनही काम केले. पण तिने कधीही याबद्दल क्षमा मागितली नाही. उलट, तिने या अनुभवांबद्दल स्पष्ट, निर्भीडपणे आणि समाजाच्या स्त्रीविरोधी दृष्टीकोनावर प्रखर प्रकाश टाकत लिखाण केले.

१९६९ मध्ये प्रसिद्ध झालेले 'आय नो व्हाय द केज बर्ड सिंग्स' हे तिचे पुस्तक अत्यंत लोकप्रिय ठरले.

त्यात बलात्कार, वर्णद्वेष यासारख्या कटू सत्यांचा उघड उघड उल्लेख होता. कृष्णवर्णीय मुलीचे जीवन जसे आहे, त्याच्या सर्व गुंतागुंतीसह ते प्रामाणिकपणे मांडलेले होते. तिने जे जसे घडले तसे मांडले होते. तिच्या या पुस्तकावर अनेक ठिकाणी बंदी घातली. पण त्याच वेळी ते अनेकांसाठी आशेचा किरण ठरले आणि त्यामुळेच ते लोकप्रिय झाले.




माया अँजेलू वेदना विसरून जाण्यावर नव्हे, तर त्यातून अर्थ शोधण्यात विश्वास ठेवत असे. ती वेदनेतून शहाणपण, कथा आणि शक्ती निर्माण करत असे.

आपल्या आत दडलेली वेदना, दुःख न सांगता सहन करणे याहून मोठे दुःख नाही हे तिचे प्रसिद्ध वाक्य होते. ती हे मनापासून मानायची.

तिचा आवाज समजूतदार, सुरेल आणि हृदयाला भिडणारा होता. दुर्लक्षित, अपमानित लोकांना सावरून घेणारा होता. ती केवळ लेखिका नव्हती तर ती कविता करायची. आंदोलनांत पुढे असायची.

ती लोकांना हनी म्हणत आपुलकीने हाक मारायची आणि राष्ट्राध्यक्षांनाही नजरेला नजर देऊन भिडायची.

तिने शारीरिक सुखाच्या आनंदाबद्दल खुलेपणाने लिहिले.

माया अँजेलूने आपला भूतकाळ कधीही लपवला नाही. ती उघडपणे बोलत राहिली. त्यामुळेच अनेकांना तिचा आधार वाटायचा.

## मुंबई पालिकेला नवे सायरन मुख्यमंत्र्यांची माहिती

■ मुंबई

**मुंबईतील** सायरन यंत्रणा काम करत नाहीत हा आरोप फेटाळतानाच, मुंबई महानगरपालिका आणि जिल्हा नागरी संरक्षण विभागाला एकूण १४२ नवीन सायरन देण्यात आले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लेखी उत्तरात दिली. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत या प्रकरणाला तातडीचे महत्त्व देऊन ४.५ कोटी रुपये मंजूर करून हे सायरन खरेदी केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मुंबईतील जुन्या सायरन यंत्रणेच्या नूतनीकरणाचा भाग म्हणून जानेवारी महिन्यात नागरी संरक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने मे महिन्यात १५० सायरन खरेदी करण्यासाठी ४.५ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. २७२ पैकी फक्त ३९ सायरन कार्यरत आहेत का? याविषयी शिवसेनेचे (उबाठा) आमदार वरुण सरदेसाई यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्यास सरकारने नकार दिला होता.

## पुण्यात विक्रेत्यांकडून अतिक्रमण विभागाच्या पथकावर हल्ला

■ पुणे

### कर्मचारी गंभीर जखमी

**पुण्यातील** रामटेकडी-सय्यदनगर फुटपाथवरील अतिक्रमण हटवण्यासाठी गेलेल्या महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या पथकावर भाजीपाला विक्रेत्यांनी अचानक हल्ला केला. दगड आणि लोखंडी मापांचा वापर करत हल्ला केला. या हल्ल्यात निखिल इंगळे हे कर्मचारी गंभीर जखमी झाले. महापालिकेच्या वाहनाचेही मोठे नुकसान झाले आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महापालिकेचे कर्मचारी किरण शिंदे, श्लोक तारु, रोहित अवचरे, दिनेश यादव, निखिल इंगळे, मंगेश घाणेकर, आदित्य खुडे, यश कांबळे आणि चालक अब्दुल शेख यांचे पथक डीपी रोड, नवीन म्हाडा येथे कारवाईसाठी गेले होते. तेथे ५ ते ६ विक्रेते रस्त्यावर फळे व भाजी विक्री करत होते. पथकाने कारवाई सुरू केली असता विक्रेत्यांनी विरोध केला. अधिकारी किरण शिंदे यांनी समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. उलटपक्षी, विक्रेत्यांनी अचानक दगडफेक करत लोखंडी मापाने मारहाण सुरू केली. यामध्ये निखिल इंगळे यांच्या डोक्यावर व कपाळावर गंभीर जखम झाली. महापालिकेच्या वाहनाचीही तोडफोड करण्यात आली. या हल्ल्यामुळे पथकाला माघारी परतावे लागले.

## चार दिवस अंबुद उत्सव! विविध साहित्यिक कार्यक्रम

■ मुंबई

**स्वामीराज** प्रकाशन आणि पल्लवी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अंबुद हा वार्षिक पावसाळी साहित्यिक उत्सव १२ , १३, २६ आणि २७ जुलै या चार दिवशी आयोजित करण्यात आला आहे. यंदा हा उत्सव कुर्ला नेहरूनगर येथील प्रबोधन प्रयोगघरात सायंकाळी ५ ते ९ या वेळेत होणार आहे.

शनिवार १२ जुलै रोजी उत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी रामदास फुटणे यांच्या हस्ते होणार असून, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार अध्यक्षस्थान भूषवतील. दिग्दर्शक देवेंद्र पेम उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर राजकीय संपादक उदय तानपाठक हे फुटाणे यांची मुलाखत घेणार असून, पहिल्या दिवसाची सांगता शशिकांत तिरोडकर, सई लळीत आणि सतिश कानविंदे यांच्या हास्यकवी संमेलनाने होईल. १३

**■ १२ , १३, २६ आणि २७ जुलै रोजी आयोजन**

जुलै रोजी उत्सवाच्या दुसऱ्या दिवसाचे अध्यक्षस्थान भूषवतील ज्येष्ठ संपादक विनायक पात्रुडकर. ज्येष्ठ साहित्यिक महेश केळुस्कर खास उपस्थित राहतील. यावेळी देहदान या विषयावर अभिनेता अंकुर वाढवे आणि जे जे रुग्णालयाचे डॉ. रेवत कानिंदे यांची ज्येष्ठ पत्रकार प्रसाद मोकाशी मुलाखत घेतील. त्यानंतर डॉ. मिलिंद विनोद यांचा 'आयुष्य थोडे चित्र, बरेच विचित्र' हा एकपात्री कार्यक्रम सादर होईल. २६ जुलै रोजी ज्येष्ठ अभिनेता नारायण जाधव यांच्या अध्यक्षतेखाली उत्सवाचे तिसरे पुष्प गुंफले जाणार असून, ज्येष्ठ संपादक श्रीकांत बोजेवार यांची ज्येष्ठ संपादक मुकेश माचकर यांनी घेतलेली मुलाखत ही या दिवसाचे खास आकर्षण आहे. त्यानंतर राजकीय, सामाजिक भाष्यकार सॅबी परेरा यांची संदेश कामेरकर मुलाखत घेतील.

२७ जुलै रोजी ज्येष्ठ संपादक संजीव साबडे आणि राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ यांच्या उपस्थितीत उत्सवाचा समारोप होईल.

## बुलडाण्यात भररस्त्यात डॉक्टरने पेटवून घेतले

■ बुलडाणा

**जिल्ह्यातील** नांदुरा तालुक्यात एका डॉक्टरने भररस्त्यात स्वतःच्या अंगावर पेट्रोल ओतून पेटवून घेतल्याने खळबळ उडाली. याप्रसंगी घटनास्थळी उपस्थित असलेल्या लोकांनी आग विझवली. मात्र ती व्यक्ती भाजून गंभीर जखमी झाली.

चंदू पाटील असे या डॉक्टरचे नाव आहे. ते पशुवैद्यक असून, जळगाव जामोद तालुक्याचे रहिवासी आहेत. बुलडाणा जिल्ह्याच्या घाटाखालील भागातील रहदारीच्या नांदुरा ते जळगाव मार्गावर आलमपूर फाटा येथे ही घटना घडली. सकाळची वेळ असल्याने दैनंदिन ये-जा करणारे कर्मचारी, मजूर आणि विद्यार्थी यांची आलमफाट्यावर नेहमीप्रमाणे गर्दी होती. तेवढ्यात या डॉ. पाटील यांनी स्वतः च्या अंगावर पेट्रोल ओतून कोणालाही काही कळायच्या आत आग लावून घेतली. अचानक झालेल्या या प्रकाराने सारेच गोंधळून गेले. मात्र त्याही परिस्थितीत काही जणांनी प्रसंगावधान दाखवून पाटील यांच्या अंगावर पाणी ओतून आग विझवली. सध्या त्यांना खामगा येथील उप जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## वसईत गुरुपौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ वसई

**वसई** पश्चिमेतील श्री स्वामी समर्थ माऊली मंदिर, पंडित वाडी, वासळई येथे उद्या गुरुपौर्णिमेनिमित्त उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या भक्तिमय उत्सवात श्री स्वामी समर्थांचे पूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर स्वामी भक्तांसाठी दर्शन आणि तीर्थ प्रसादाचा लाभ घेता येईल. या उत्सवाला सर्व स्वामी भक्तांनी उपस्थित राहून या उत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन समस्त श्री स्वामी समर्थ भक्त परिवाराच्या वतीने देवेंद्र नरेंद्र पंडित यांनी केले आहे. या दिवशी मंदिरात येणाऱ्या भक्तांनी आपली वाहने पंडित वाडी परिसरात किंवा मंदिराजवळील मोकळ्या जागेत उभी करू नयेत, अशी विनंती आयोजकांनी केली आहे.

## मिरा-भाईंदरचे पोलीस आयुक्त पांडेंची बदली


■ भाईंदर

**मिरा** भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांची आज बदली करण्यात आली. त्यांना पदावरून हटवून सरकारने त्यांची नियुक्ती अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) म्हणून केली. त्यांच्या जागी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अपर पोलीस महासंचालक निकेत कौशिक हे मिरा-भाईंदर, वसई-विरारचे नवे पोलीस आयुक्त बनले आहेत.



मिरा रोड येथे अमराठी व्यापाऱ्यांनी काढलेल्या मोर्चाला प्रत्युत्तर म्हणून मनसे आणि महाराष्ट्र एकीकरण समिती यांनी काल मराठी भाषिकांचा मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. मात्र, या मोर्चाला पोलिसांनी आधी परवानगी नाकारल्याचा आरोप मनसेने केला होता. मनसेचे काही नेते, कार्यकर्ते यांना मध्यरात्री ताब्यातही घेतले होते. यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. या पार्श्वभूमीवर आज राज्य सरकारने मधुकर पांडे यांची उचलबांगडी केली. मात्र, ही कारवाई सरकारने मोर्चा रद्द करण्यावरून वाद झाल्याने स्वतःचा बचाव म्हणून केली आहे, अशी चर्चा आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१३०७



**आडवे शब्द –**

१. सवाई ५. दशानन ९. धन, वित्त ११. सुकामेव्यातील एक पदार्थ १२. ओसाड जमिनीवर किंवा पिकात वाढणारे तण, पांढरफुली १४. जिवलग, निकटचा १६. बळजबरी १७. आस्था १८. वर्ष, संवत्सर १९. सरपणाचे दुकान २०. साखर कारखान्यात बनणारा उग्र वासाचा पदार्थ २१. फुटाणे २२. पुराणातील एक पर्वत, मुलांचे एक नाव २४. मनसोक्त २७. प्रथा, वहिवाट २८. ओठ २९. युद्धात हरवणे ३१. पारतंत्र्य ३४. चपला, वीज ३६. मैत्रीण, आठवण ३७. मांजर ३८. चांगला, सज्जन ३९. दिवाळीतील भाजणीचा तिखट पदार्थ ४०. लकाकी ४१. प्रगल्भता, सारासार विवेक ४३. अल्प, थोडे, उणे ४४. लाकडाचा प्रकार ४५. राजवाडा, प्रासाद ४७. मोठा माठ, रांजण ४९. पाण्यात व जमिनीवर राहू शकणारा दीर्घायुषी प्राणी ५०. एकत्र प्रवासाला निघालेला समूह, तांडा ५४. उपयोग करणे ५६. गुलाम ५९. सरकारी कागद, दस्तऐवज ६२. इच्छा ६३. डोळ्याच्या उघड्या भागावरील पारदर्शक आवरण ६४. शासनकर्ता ६५. तंबाखूचे चूर्ण ६७. नाविकाचे दिशादर्शक यंत्र ७०. विपुल उपलब्धता ७१. उठाव, क्रांती ७४. कावळा ७५. रामाचे एक नाव ७७. अमली, कैफ आणणारे ७९. सोशिक ८०. कवितेचा मुख्य अलंकार ८२. पानसुपारीचे साहित्य असलेला बटवा ८३. जादूटोणा ८५. वारंवार ८७. पादत्राणांचा सुटसुटीत प्रकार ८९. अनुरक्त, प्रेमात पडलेला ९०. लहान घागर ९२. आतड्याचे खालचे टोक ९५. रहस्य, मख्खी ९६. धुंदी ९७. ज्ञानेश्वरांनी चांगदेवाला केलेला उपदेश ९८. खोकला १००. शुष्क, बेचव १०२. तजेला १०३. कागदाच्या सुंदर वस्तू बनवण्याची जपानी कला १०४. मोठेपणा, आदर

**उभे शब्द –**

१. टोमणा २. नकाराचा सूर, रडगाणे ३. मेघाच्छादित आभाळ ४. वावटळीमुळे हवेत उडणारी माती-कचरा ५. हातची संधी घालवणे, वाया घालवणे ६. शंभर ७. खजिन्याचा प्रभारी ८. पगडा ९. भ्रमण, वावरणे, फिरणे १०. फिर्यादि ११. एकाकी पडलेला १३. समीप, निकट १५. प्रशंसा, स्तुती १७. कलिका १८. पिशाच्च २०. डास २१. मनाची द्विधावस्था २३. चंद्र २५. गुजराथी न्याहारीतील धपाटे २६. निःशंकपणे २८. या बाजूला, सध्या २९. पादत्राण ३०. एक खाद्यतेल ३२. धाक ३३. नाटक बसवण्याचा सराव, व्यायामाची पारंपरिक जागा ३५. बस्तान ३६. विसार, उचल ३८. प्राणायामाचा एक प्रकार ४२. स्वादिष्ट ४४. आर्द्रता ४६. नुकसान ४८. पोपट, राघू ५१. भटक्या ५२. आनंद, हर्ष ५३. कंबरेचा पट्टा ५५. फेटा ५७. मचूळ, बेचव ५८. टाळाटाळ ६०. शहाणा ६१. गाणे रचणारा ६२. वडिलांची वहिनी ६३. भांडे ६४. शरद ऋतूतील ६६. पोबारा ६७. फाल्गुन महिन्यातला सण ६८. उपकरण ६९. शंकराचे धनुष्य ७२. टपाल ७३. अमर्याद ७४. काळा-तांबडा भोपळा, गंगाफळ ७६. नावापुरता, अगदी थोडे ७७. किल्ल्याच्या तटाखालचा उताराचा भाग ७८. अप्रिय ८१. दिवस ८२. तेल लावून डोक्याला मालिश ८३. अनुचर, शिष्य ८४. सुती कापडावर रंगीत छपाईची कला ८५. शेपूट ८६. युद्धभूमी ८८. टापू, प्रदेश ९०. बैराग्याचे वस्त्र ९१. खाली डोके वर पाय असे योगासन ९२. चिंचेची चव ९३. भेकड, नेभळट ९४. वातड ९९. स्वजन, स्वकीय १०१. विष्णूची पत्नी, लक्ष्मी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३०६चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. काला ३. बल्लव ५. अतएव ९. क्षमाशील ११. राजगिरा १३. क्रमप्राप्त १५. शिष्टसंमत १७. धाकटा १९. तमा २०. हेला २१. गहजब २४. रगड २६. पल्ला २८. हाकाटी ३०. घंटी ३१. पंकज ३३. कवडी ३४. विदुर ३५. मुलगा ३७. पथक ३९. रवसड ४१. न्याहारी ४३. यश ४४. कोंबडी ४५. साठा ४७. आग ४८. पालक ५०. बखोट ५१. लग ५३. ऊस ५५. शेवरी ५६. कड ५७. जाहीर ५८. शेजी ५९. कटोरा ६०. वळण ६१. काव ६२. मेनका ६३. ओणम ६५. नाट ६७. प्रसंगावधान ६९. मयासुर ७१. कमळकाकडी ७४. शैली ७५. रखवाली ७७. कोमल ७८. बूट ७९. सारभात ८१. नटी ८३. डाली ८४. चकमक ८६. होडके ८८. कद्रू ९०. लपवणे ९२. तग ९४. साकव ९६. कामला ९९. टर १०१. जवान १०३. नमन १०६. हाट १०७. स्वयंभू १०९. पाचजन्य ११०. कस्पटासमान ११२. तन्वंगी ११३. पगार ११४. तीर ११५. सतार

**उभे शब्द :** १. कारागीर २. लाज ३. बराक ४. वक्र ५. अप्रामाणिक ६. तप्त ७. वशिला ८. व्यासंग ९. क्षतज १०. शीत १२. गिधाड १४. मत १६. महती १८. टापटीप २०. हेतू २२. बहादुरी २३. ताटी २५. गझल २७. कवडसा २९. कार ३१. पंक ३२. जरब ३३. कस ३४. विहार ३५. मुदपाकखाना ३६. गायक ३८. थट्टेखोर ४०. वडील ४२. डिंगरी ४६. ठाऊक ४७. आवरण ४९. लड ५०. बहीण ५२. गजानन ५४. सटोडिया ५७. जाळपोळ ५८. शेवगा ६१. कासंडी ६२. मेधा ६३. ओरखडा ६४. मवाली ६६. टकमक ६७. प्रकट होणे ६८. वजीर ६९. मलीन ७०. सुर ७२. मलमल ७३. काबू ७६. वाली ७७. कोच ७९. साकेत ८०. भार ८२. टीक ८५. कपट ८७. मूक ८९. फलाट ९१. वरपांगी ९३. गज ९४. सान ९५. वनस्पती ९७. महानता ९८. अस्वल १००. अंजन १०२. वाडगा १०४. मटार १०५. नस १०८. भूत १११. मास

# महाराष्ट्रावर सतत टीका करतात आता बडोद्यात पूल कोसळला! ११ ठार

पान १ वरून

पाच वाहने पुलावरून कोसळली. तर दोन वाहने थोडक्यात बचावली आहेत. नऊ जणांना वाचवण्यात आम्हाला यश आले.

हा पूल मध्य गुजरातला सौराष्ट्राशी जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. पुलाच्या कोसळण्यामुळे संपूर्ण वाहतूक विस्कळीत झाली असून, आता प्रवाशांना अहमदाबादमार्गे मोठ्या वळणावरून प्रवास करावा लागणार आहे. या दुर्घटनेमुळे जुन्या पुलांची तातडीने सुरक्षा तपासणी करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी या घटनेच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यांनी एक्स पोस्टद्वारे मृतांच्या कुटुंबियांना ४ लाखांची आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. तर सर्व वैद्यकीय खर्च राज्य सरकार उचलणार असेही सांगितले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या घटनेबद्दल शोक व्यक्त करत राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या नातेवाईकांना २ लाख व जखमींना ५० हजार रुपये मदतीची घोषणा केली.

काँग्रेस आमदार अमित चावडा यांनी पूल दुर्घटनेवरून सरकारवर टीका केली की, स्थानिक लोकांनी सरकारकडे पूल खराब अवस्थेत असल्याची वारंवार तक्रार केली होती. पत्रेही लिहिली होती, पण सरकारने याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळेच हा अपघात झाला आणि निष्पाप नागरिकांचा जीव गेला.

सरकारने या प्रकरणी तातडीने चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी. गुजरातमध्ये अशा दुर्घटना वारंवार होत असल्यामुळे राज्य सरकारने सर्व पुलांचे ऑडिट करावे. त्यांचे प्रमाणपत्र काढून ते जनतेसाठीही सार्वजनिक करावे. ज्यामुळे भविष्यात असे अपघात टाळता येतील.

# तुकडेबंदी कायदा रद्द! बावनकुळेंची घोषणा

पान १ वरून

१० गुंठे क्षेत्र आवश्यक होते. विहिरीसाठी किंवा शेतरस्त्यासाठी किंवा इतर काही कारणास्तव १ ते ३ गुंठ्यांमध्ये व्यवहार करणाऱ्या हजारो शेतकऱ्यांना अडचणींना तोंड द्यावे लागत होते. आता हा अडथळा दूर झाल्याने लहान शेतकरी आणि सामान्य नागरिक यांना मोठा आर्थिक व कायदेशीर दिलासा मिळणार आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राज्यातील १ जानेवारी २०२५ पर्यंत झालेले तुकडे कायदेशीर मानले जातील. महसूल, नगरविकास आणि जमाबंदी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती तयार केली जाणार असून, ती १५ दिवसांत नियमावली तयार करेल. या काळात नागरिकांना आपल्या सूचनाही देता येतील. ज्या ठिकाणी एक गुंठ्याचे भूखंड तयार झाले आहेत, तिथे तुकडेबंदी कायदा पूर्णपणे रद्द केला जाईल. अनेकांनी २० गुंठ्यातून भूखंड वाटप करून १० जणांनी व्यवहार केले आहेत, त्यांची पुन्हा नोंदणी व्हावी अशी मागणी असून, नवा कायदा आणि नियमावली तयार झाल्यावर मालमत्तेची पुन्हा नोंद सुरू होणार आहे.

काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा आणि अत्यंत महत्त्वाचा निर्णय आहे. तुकडेबंदीमुळे अनेकांची फसवणूक झाली, आत्महत्याही झाल्या. सरकारने उचललेले हे पाऊल सकारात्मक आहे.

# आहार संघटनेचा आंदोलनाचा इशारा

पान ८ वरून

कर (व्हॅट) ५ टक्क्यांवरून १० टक्के करण्यात आला. परवाना शुल्कात १५ टक्के वाढ झाली आणि मद्यावरील उत्पादन शुल्कात थेट ६०% टक्के वाढ झाली आहे. यामुळे उद्योग चालवणे कठीण झाले असून, ग्राहकही दूर जात आहेत. २०१४ मध्ये परवाना शुल्क ३ लाख रुपये होते, जे आता १० लाख झाले. या वाढत्या खर्चाचा ग्राहकांना फटका बसत आहे. कोरोनानंतर सावरत असलेला व्यवसाय पुन्हा संकटात आला असून, शासनाकडून कोणतीही सबसिडी मिळत नाही. दरवाढीमुळे सीमावर्ती राज्यांतून मद्याची अवैध वाहतूक वाढण्याची शक्यता असून, यामुळे करचोरी, भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी वाढण्याचा धोका आहे. राज्यात अनधिकृत हॉटेल व्यावसायिकाला एकही नियम किंवा कर लागू नाही. आम्ही उत्तम सेवा देऊनही आमच्यावर कर लादले जात आहेत. त्यामुळे आम्ही अशा हॉटेल आणि व्यावसायिकांवर कारवाई करा, अशी मागणी करत आहोत.

पुढे ते म्हणाले की, मुंबईला टूरिस्ट हब बनवायचे आहे म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यालयाने मित्र असोसिएशनच्या माध्यमातून एक कार्यशाळा आयोजित केली होती. सहा तास चाललेल्या या कार्यशाळेनंतर हॉटेल आणि रेस्टॉरंट उद्योजकांना कोणतीही विचारणा करण्यात आली नाही. मुंबईला टूरिस्ट हब बनवायचे असेल तर आम्ही त्यात कुठे आहोत? २०१६ मध्ये अन्न पदार्थावर १८ टक्के जीएसटी लावला होता. त्यामुळे आमचे ५० टक्के नुकसान झाले.

या उद्योगावर ४८,००० पुरवठादार अवलंबून आहेत. याशिवाय, अंदाजे १८ लाख लोक अप्रत्यक्षरित्या या उद्योगाशी जोडले गेलेले आहेत. त्यामुळे आमची मागणी आहे की, तुम्ही दर वाढवा, पण ते काही काळानंतर आणि मर्यादेमध्ये वाढवा. तसेच व्हॅट पूर्णपणे बंद करा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी आम्ही वेळ मागितला आहे. परंतु अद्याप आम्हाला वेळ मिळालेला नाही.


**जाहीर सूचना**

श्री. योगेश तुकाराम घरत आणि श्री. तुषार तुकाराम घरत उर्फ तुशाल तुकाराम घरत, दोघेही सज्ञान, भारतीय निवासी आणि राहणार - तुकाराम घरत, धाकटी जुई, हरिश्चंद्र पिंपळे, दिघोडे, रायगड, महाराष्ट्र - ४१०२०६, श्री. प्रकाश हिराजी घरत आणि सौ. नूतन अनंता खारकर उर्फ नूतन अनंत खारकर, दोघेही सज्ञान, भारतीय निवासी आणि राहणार - ५२८, हरिश्चंद्र पिंपळे, दिघोडे, रायगड, महाराष्ट्र - ४१०२०६, सौ. शोभा तुकाराम घरत, सज्ञान, भारतीय निवासी आणि राहणार - तुकाराम हिराजी घरत, ८५५, धाकटी जुई, हरिश्चंद्र पिंपळे, दिघोडे, रायगड, महाराष्ट्र - ४१०२०६ आणि सौ. पूजा गणेश पाटील, सज्ञान, भारतीय निवासी आणि राहणार - गणेश सुरेश पाटील, ४७, गावदेवी मंदिराजवळ, पुनाडे, रायगड, महाराष्ट्र - ४१०२०६ (एकत्रितरित्या "**विक्रेते**") यांच्यासह याखाली लिहिलेल्या **अनुसूची**मध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता ("**सदर मालमत्ता**") मधील आणि वरील विक्रेत्यांचे हक्क, शीर्षक आणि हितसंबंध विक्रेत्यांकडून संपादित करण्याकरिता माझे अशील बोलणी करीत आहेत.

कोणा व्यक्तींचा मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाविरुद्ध, मध्ये, करिता किंवा वर विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, देखभाल, ताबा, विकास, भाडेकरू, भाडेपट्टी, लिव्ह ॲण्ड लायसन्स, धारणाधिकार या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, हितसंबंध, दावा असणाऱ्या किंवा अन्यथा सदर मालमत्ता विक्रेत्याद्वारे आमच्या अशिलाच्या नावे विक्री आणि हस्तांतरण करण्यास आक्षेप असल्यास याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी त्याबाबत लेखी स्वरुपात, अशा दावा किंवा आक्षेपाच्या समर्थनार्थ दस्तऐवजांसह निम्नस्वाक्षरीकार यांना मे. क्लायंट रेक्ट्स ॲण्ड कं., बंगलो क्र. १८२, पहिला मजला, सें. ब्राझ रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई ४०००५६ येथे सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीमध्ये सूचित करावे, असे न केल्यास आमच्या अशिलांद्वारे असे समजण्यात आणि स्वीकारण्यात येईल की, तेथे असा कोणताही दावा किंवा आक्षेप अस्तित्वात नाही; आणि तो अस्तित्वात नसलेला/सोडून दिला/त्याग केला असे समजण्यात येईल; आणि आमचे अशील त्यानंतर सदर मालमत्ता कोणताही दावा किंवा आक्षेप असला तरीही विक्रेत्यांकडून संपादित करण्याची प्रक्रिया सुरु करतील.

**अनुसूची**

सदर मालमत्तेचे वर्णन

विधाने, ग्रामपंचायत विधाने येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या रायगडच्या नोंदणीकरण जिल्ह्यामधील गाव विधाने, तालुका उरणचा सर्व्हे क्र. ३००, हिस्सा क्र. १ येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या कृषिक जमीन किंवा मैदान मोजमाप अदमासे ८६३० चौरस मीटर्स समतूल्य १०३२१.३९ चौरस यार्ड्सचे सर्व खंड आणि तुकडे; आणि चतुःसीमा खालीलप्रमाणेः

पश्चिमेस किंवा त्या दिशेनेः तुकाराम कृष्णा मोकल यांच्या मालकीचा सर्व्हे क्र. ३००, हिस्सा क्र. १

पूर्वेस किंवा त्या दिशेनेः संजय अर्जून माळी यांच्या मालकीचा सर्व्हे क्र. २५७, हिस्सा क्र. ४

उत्तरेस किंवा त्या दिशेनेः रंजना सुरेश भोईर यांच्या मालकीचा सर्व्हे क्र. ३०३

दक्षिणेस किंवा त्या दिशेनेः प्रल्हाद पाटील आणि मेघा श्रीराम गव्हाणे यांच्या मालकीचा सर्व्हे क्र. ३००, हिस्सा क्र. २ आणि सर्व्हे क्र. ३०० हिस्सा क्र. १.

दिनांक १० जुलै, २०२५

मे. क्लायंट रेक्ट्स ॲण्ड कं.करिता
सही/-
**प्राची पटेल**
ॲडव्होकेट


# शिक्षकांच्या आंदोलनाचा अखेर विजय शरद पवार-ठाकरेंची प्रथमच उपस्थिती

पान १ वरून

सगळे धाडसी निर्णय आम्ही घेतले. यावेळी आर्थिक कारणांमुळे उशीर झाला. पण आता वेळ घालवण्यात अर्थ नाही. म्हणूनच फडणवीस साहेबांनी आज वित्त विभागाबरोबर बैठक घेतली. तुमचे काम आम्हीच करणार. काही तांत्रिक बाबी आहेत. पुरवणी मागण्यांतून पैसे घेतलेले नाहीत. दुसऱ्या कुठल्या खात्यातून पैसे घ्यावे लागतील. म्हणूनच या तांत्रिक गोष्टी समजून अधिवेशन संपताच १८ तारखेला तुमच्या खात्यात २० टक्के वाढीव टप्प्याचा पगार जमा झालेला असेल. हे एका महिन्यासाठी नाही, तर पुढेही पगाराची वाट पाहावी लागणार नाही.

मुंबईत कालपासून सुरू झालेल्या या आंदोलनात २५,००० हून अधिक विनाअनुदानित शिक्षक सहभागी झाले होते. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी कालपासून आंदोलनात सहभागी होऊन आंदोलनस्थळी मुक्कामच ठोकला होता. शिक्षकांना न्याय मिळेपर्यंत तेथेच थांबण्याचा निर्धार व्यक्त केला होता. खासदार खा. सुप्रिया सुळे, आ. जितेंद्र आव्हाड, खा. नीलेश लंके, काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनीही येथे येऊन आंदोलनाला पाठिंबा दिला होता.

दरम्यान, मुख्यमंत्र्यांची आंदोलनकर्त्या शिक्षकांशी भेट होण्याआधी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी त्यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दिला होता. यावेळी शरद पवार म्हणाले की, मागील काही दिवसांपासून शिक्षक आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संघर्ष करत आहेत. राज्य प्रशासनाचा महत्त्वाचा भाग असलेल्या शिक्षकांचा सन्मान राखणे हे सरकारचे कर्तव्य आहे. आमदार रोहित पवारांकडून समजले की, येथे एक मंत्री आले होते. त्यामुळे वाटले की प्रश्न मार्गी लागेल. पण अजूनही प्रश्न सुटलेला नाही. १९८०-८१ मध्ये शिक्षकांनी असेच आंदोलन केले होते. तेव्हा केंद्र सरकार जे देते, ते राज्याने द्यावे अशी मागणी होती. ती नाकारली. त्यानंतर मी ती जबाबदारी घेतली आणि शिक्षकांची मागणी मान्य केली. आता त्याच महाराष्ट्रात शिक्षकांना अनुदानासाठी रस्त्यावर उतरावे लागत आहे, हे दुर्दैवी आहे.

शिक्षकांच्या मागणीसाठी लवकरात लवकर निधीची तरतूद करा. त्यांच्यासाठी आम्ही सर्वजण आग्रही भूमिका घेणार आहोत. निर्णय झाल्यानंतर जीआर काढायला अर्थखात्याकडे जावे लागते. सामान्य प्रशासन खात्याकडे जावे लागते. महाराष्ट्राची विधानसभा, विधान परिषद आणि देशाची लोकसभा, राज्यसभा यात मी ५६ वर्षे सतत कार्यरत आहे. त्यामुळे कसा निर्णय घ्यायचा असतो, कशी तरतूद आणायची असते आणि ती कशी तुमच्यापर्यंत पोहोचवायची असते, हे मला कोणी सांगायची गरज नाही. तुमच्या मागण्या मान्य होण्यासाठी सरकारशी संवाद साधू आणि प्रश्न सोडवू.

उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले की, आपली संस्कृती ही 'गुरू देवो भव' अशी आहे. मातृदेवो भव, पितृदेवो भव आणि गुरू देवो भव ही आपली मूल्ये आहेत. आजचे सत्ताधारी हे विसरले आहेत. त्यांना गुरू म्हणजे काय हेच समजत नाही. त्यांच्या गुरूंच्या आज्ञा दिल्लीहून येतात आणि त्या अंमलात आणताना आपल्या गुरूंवर म्हणजे शिक्षकांवर अन्याय केला जातो. ही गोष्ट अत्यंत लज्जास्पद आहे. शासनाने ऑक्टोबर २०२४ मध्ये अधिवेशनात निर्णय घेतला होता. राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्यासाठी सातत्याने आंदोलन करूनही या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही. शिक्षकांना चिखलात बसून आपल्या हक्कासाठी आवाज उठवावा लागत आहे. हाच या सरकारचा खरा चेहरा आहे. ठाकरे गट तुमच्या खांद्याला खांदा लावून उभा राहील. तुमचे हक्काचे अनुदान मिळेपर्यंत आम्ही शांत बसणार नाही.

# इतके पैसे कुठून आणता?

पान १ वरून

एवढेच नाही तर बोरिवलीमध्ये दुकान, नालासोपारा येथे रेस्टॉरंट, कोकणात केळवे येथे निवासी मालमत्ता या नेत्याकडे आहे. हे एवढा पैसा कुठून आणतात? दुबेंनी आपल्या पोस्टमध्ये संबंधित नेत्याचे नाव मात्र लिहिलेले नाही. त्यामुळे एवढी मालमत्ता ठाकरेंच्या कोणत्या नेत्याकडे आहे, याबाबत आता चर्चेला उधाण आले आहे. दुबेंनी दुसऱ्या एका पोस्टमध्ये २००७ च्या विकिलिक्सच्या अहवालाचा हवाला देत राज ठाकरेंवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले की, राज ठाकरेंना जनतेचे समर्थन मिळत नाही तेव्हा गुंडांना पुढे करतात. याचा अर्थ गुंडगिरी हा त्यांचा खरा हेतू आहे. माझा विरोध ठाकरेंच्या गुंडगिरीला आहे. सहनशीलता संपली आहे. मराठा समाज नेहमीच आदरणीय आहे. देश आपल्या सर्वांचा आहे. मी जिथे खासदार आहे तिथून मराठा मधु लिमये जी सलग तीन वेळा खासदार होते. इंदिरा गांधीजींच्या विरोधात आम्ही एका मराठ्याला लोकसभा जिंकून दिली. ठाकरे, भानावर या, तुमचा लढा मराठा बनवू नका, आम्ही मुंबईच्या विकासातही योगदान दिले आहे आणि देत राहू.

# केंद्र सरकारच्या कामगार धोरणांविरोधात देशव्यापी बंद

पान १ वरून

करण्याचा प्रयत्न झाला. मात्र पोलिसांनी वेळेवर पोहोचून आग विझवली. राज्यभरात कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. जादवपूर रेल्वे स्थानकाजवळ डाव्या पक्षांचे कार्यकर्ते रेल्वे रूळांवर बसून केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत होते. त्यामुळे रेल्वेसेवा विस्कळीत झाली होती. जादवपूर परिसरात डाव्या विचारसरणीच्या संघटनांनी मोर्चा काढला. त्यात मोठ्या संख्येने कामगार सहभागी झाले. मिदनापूर सेंट्रल बस स्थानकाजवळ वाहतूक रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. कोलकातामध्ये काही ठिकाणी खासगी आणि सरकारी बस सेवा सुरू होत्या. बसचालकांनी हेल्मेट घालून बस चालवली. हावडा येथे पोलिसांनी लाठीमार करत आंदोलकांना पांगवले. केरळमध्ये बंदला मोठा प्रतिसाद मिळाला. आरोग्यसेवा वगळता सर्व व्यवहार ठप्प राहिले. तामिळनाडूमध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांनी संप पुकारला. झारखंडमधील रांची येथे सीएमपीडीआय कार्यालयाबाहेर निदर्शने झाली. बिहारमध्ये रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला. जेहानाबाद येथे आंदोलकांनी राष्ट्रीय महामार्ग-८३ अडवण्याचा प्रयत्न केला. त्यांची पोलिसांशी झटापट झाली. पोलिसांनी पाच आंदोलकांना ताब्यात घेतले. रांचीमध्ये एआयटीयुसी कार्यकर्त्यांनी सीएमपीडीआय मुख्यालयाबाहेर निदर्शने केली. ओडिशामधील भुवनेश्वर येथे सीआयटीयू कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय महामार्ग अडवला. कटक आणि पुरी येथे किरकोळ आंदोलने झाली. कोट्टायम व कोईमतूरमध्ये मॉल व दुकाने बंद ठेवण्यात आली. दिल्ली-एनसीआरमध्ये भारत बंदचा फारसा परिणाम दिसून आला नाही. महाराष्ट्रात बंदचा प्रभाव मर्यादित राहिला.

# गिरणी कामगारांना धारावीमध्ये घरे द्या!

पान ८ वरून- या मुंबईवर अधिकार सांगितला जात होता. तेव्हा हा गिरणी कामगार रस्त्यावर उतरला व त्यांनी दिल्लीतल्या सरकारला गुडघ्यावर आणत आपली मुंबई राखली. त्याच मुंबईमध्ये आता परत हे दिल्लीच्या मालकांचे नोकर सत्तेवर बसले आहेत. ते गिरणी कामगार व मराठी माणसाला मुंबई बाहेर काढायला बसले आहेत. त्यांना फक्त मुंबई हवी आहे. त्यांनी आता धारावीच्या पाचशे एकर जागेसाठी मुंबईची १६०० एकर जागा अदानीच्या घशात टाकली आहे. देवनार डम्पिंग ग्राऊंड, मिठागर, कुर्ला डेअरी सगळे अदानीला दिले आहे. आज गिरणी कामगार संपाला किती वर्षे झाली लक्षातदेखील नाही. गिरणी कामगारांची दुसरी-तिसरी पिढी आहे. त्या काळात संप झाला. गिरणी कामगारांना उद्ध्वस्त केले. सगळ्या जमिनी घशात टाकून त्यावर टॉवर उभे केले. सोन्यासारखी जागा गिरणी मालकाच्या घशात टाकल्या.

ज्यांनी आपल्याला मुंबई मिळवून दिली त्यांना शेलू आणि वांगणीला टाकत आहेत. ज्यांच्यावर मुंबई आहे त्यांना इथे हक्काची घरे मिळालीच पाहिजेत. मी तुम्हाला न्याय मिळवून दिल्याशिवाय राहणार नाही. आपले सरकार आले असते तर तुमच्यावर आंदोलनाची वेळ आली नसती. मनसेचे बाळा नांदगावकर म्हणाले की, मुंबईत घर मिळावे ही गिरणी कामगारांची मुख्य मागणी आहे. आज धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे कंत्राट अदानीला दिले आहे. परराज्यातून येणाऱ्यांना मुंबईत घरे दिली जात आहेत. मग गिरणी कामगारांना घरे का दिली जात नाहीत?


**सार्वजनिक सूचना**

सार्वजनिक सूचनार्थ कळविण्यात येते की, दिनांक ११.०८.२०१८ रोजीच्या मूळ विक्री करारातील (दस्त क्र.: ११४०६/२०१८) एक चलनाचे पान (करारातील पान नं. ३/८६) हरवले आहे. सदर करार B-1302 श्रद्धा एवोक, लेक रोड, भांडुप पश्चिम, येथील सदनिकेसंदर्भात श्रद्धा लँडमार्क्स प्रा. लि. आणि श्रीमती अर्चना विलास क्षीरसागर व श्री सौरभ गजानन गावडे यांच्यामध्ये झाला होता.

कोणाला सदर हरवलेले चलन पान सापडल्यास कृपया खालील क्रमांकावर संपर्क साधावा: **श्रीमती अर्चना विलास क्षीरसागर फोन: ९८१९५०१०१७**

# नवाकाळ

• मुंबई | गुरुवार १० जुलै, २०२५ • पान -८


## राज ठाकरेंचा आदेश! प्रेसशी बोलू नका



**मुंबई** - मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसैनिकांना स्पष्ट आदेश देणारी एक्स पोस्ट काल रात्री केली. राज ठाकरे यांनी लिहिले की, एक स्पष्ट आदेश, पक्षातील कोणीही वर्तमानपत्र, वृत्तवाहिन्या किंवा कोणत्याही डिजिटल माध्यमांशी संवाद साधायचा नाही. स्वत:चे प्रतिक्रियांचे व्हिडिओही समाजमाध्यमावर अजिबात टाकायचे नाही. माध्यमांशी संवाद साधण्याची अधिकृत जबाबदारी ज्या प्रवक्त्यांना दिली आहे, त्यांनीही मला विचारल्याशिवाय, माझी परवानगी घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकारच्या माध्यमांशी संवाद साधायचा नाही. समाजमाध्यमावर व्यक्त व्हायचे नाही. या आदेशाचे नेमके कारण स्पष्ट नाही. परंतु राजकीय वर्तुळात यामुळे चर्चा रंगली आहे.

## हॉटेल-रेस्टॉरंटचा व्यवसाय अडचणीत
## आहार संघटनेचा आंदोलनाचा इशारा

■ मुंबई




**महाराष्ट्रातील** हॉटेल आणि रेस्टॉरंट उद्योग आर्थिक संकटात सापडला असून, शासनाने घेतलेल्या सातत्यपूर्ण करवाढीच्या निर्णयामुळे हा व्यवसाय कोलमडण्याच्या मार्गावर आहे, अशी चिंता आज भारतीय हॉटेल व रेस्टॉरंट संघटनेचे (आहार) अध्यक्ष सुधाकर शेट्टी यांनी व्यक्त केली. आमच्या प्रश्नाकडे सरकार लक्ष देत नसून लवकर १९,००० पेक्षा जास्त हॉटेल व्यावसायिक राज्यभर आंदोलन करणार, असा इशारा शेट्टी यांनी दिला.

सुधाकर शेट्टी म्हणाले की, अवघ्या एका वर्षाच्या कालावधीत उद्योगाला सलग व्हॅट, परवाना शुल्क आणि उत्पादन शुल्कात वाढ करण्यात आली. परिमाणी हॉटेल आणि रेस्टॉरंट उद्योगावर आर्थिक संकट ओढावले आहे. मद्यावरील मूल्यवर्धित » पान ७ वर

## १५ जुलै रोजी फेरीवाल्यांचा
## मंत्रालयावर मूक मोर्चा

■ मुंबई

मुंबईतील फेरीवाले १५ जुलै रोजी मंत्रालयावर मूक मोर्चा काढणार आहेत. मागील दोन महिन्यांपासून मुंबईतील फेरीवाल्यांवर होत असलेल्या कारवाईचा निषेध म्हणून हा मोर्चा निघणार आहे. या मोर्चाचे नेतृत्व संयुक्त फेरीवाला संघटना असोसिएशनच्या माध्यमातून माजी उपमहापौर बाबूभाई भवानजी आणि संजय यादवराव करणार आहेत. मुंबई महापालिका व पोलीस प्रशासन गेल्या काही महिन्यांपासून फेरीवाला बांधवांवर अन्याय करत आहे. अनेक वर्षांपासून रस्त्यावर उभा राहून आपला रोजगार कमावणाऱ्या फेरीवाल्यांना अडवले जात आहे. यामुळे हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह संकटात आला आहे, असे फेरीवाला संघटना असोसिएशनचे म्हणणे आहे.

## महापालिका कामगार संघटनांचा
## १६ जुलैला विधान भवनवर मोर्चा

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन खात्यांतर्गत कचऱ्याचे संकलन, परिवहन आणि विल्हेवाट हे कामकाज खासगी कंपन्यांकडून करून घेण्यासाठी १४ मे रोजी काढलेली निविदा तत्काळ रद्द करावी. तसेच, सफाई खात्याचा खासगीकरणाचा निर्णय मागे घेण्यात यावा, या मागण्यांसाठी महापालिका कामगार संघटना १६ जुलै रोजी विधान भवनवर मोर्चा काढणार आहे. तत्पूर्वी संघर्ष समितीच्या वतीने १५ जुलै रोजी मतदान घेऊन संपाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब होणार आहे.



काल झालेल्या संघर्ष समितीच्या बैठकीत १६ जुलैला मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला. पालिकेतील घनकचरा व्यवस्थापन खाते व परिवहन खात्यातील कायम कामगारांचे काम ठेकेदारामार्फत करून घेण्यासाठी काढलेली निविदा काल उघडण्यात येणार होती. त्यामुळे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे खुले नाट्यगृह, भायखळा येथे आयोजित मेळाव्यात या निविदेविरोधात संप करावा की नाही, यासाठी काल मतदान घेणार असल्याचे संघर्ष समितीने आधी जाहीर केले होते. पण ही निविदा काल न उघडता मुंबई महापालिकेने ती १८ जुलैला उघडण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे या निविदेविरोधात संप करण्याबाबत १५ जुलैला मतदान घेण्याचे निश्चित करण्यात आले.

## देवनार क्षेपणभूमीसाठी
## ३ कंपन्या स्पर्धेत उतरल्या

■ मुंबई

**देवनार** क्षेपणभूमीवरील (डम्पिंग ग्राऊंड) १८५ लाख टन कचऱ्यावर रासायनिक प्रक्रिया करून त्याचे विघटन करणे आणि क्षेपणभूमी स्वच्छ करण्याच्या कामासाठी मुंबई महानगरपालिकेने २,३६८ कोटी रुपयांची निविदा काढली होती. या निविदेला तीन कंपन्यांनी प्रतिसाद दिला आहे.

देवनार क्षेपणभूमीच्या जागेवर धारावी पुनर्विकास प्रकल्पातील झोपडीधारकांसाठी घरे बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी क्षेपणभूमीवरील कचरा साफ करण्यासाठी पालिकेने १४ मे रोजी निविदा जाहीर केल्या होत्या. त्यानुसार दररोज २,३०० टन कचऱ्यावर प्रक्रिया करून तीन वर्षांत ही क्षेपणभूमी कचरामुक्त करण्याची ही महत्त्वाकांक्षी योजना आहे. या कामासाठी १ हजार २०० वाहनांचा वापर करावा लागणार आहे. या प्रकल्पाच्या निविदापूर्व बैठकीत २१ कंपन्यांनी प्रकल्पाबाबत अनेक शंका उपस्थित केल्या होत्या. त्यामुळे पालिकेला निविदेची मुदत तीन वेळा वाढवावी लागली होती.

## गिरणी कामगारांना धारावीमध्ये घरे द्या

■ मुंबई



### उद्धव ठाकरे यांची मागणी

**गिरणी** कामगारांना धारावी, कुर्ल्यात हक्काची घरे द्या व अदानीचे टॉवर शेलू वांगणीला बांधा. देवनार डम्पिंगवर अदानीचे टॉवर होऊ द्या. पण गिरणी कामगार, पत्रकार, सफाई कर्मचारी, पोलिसांना धारावीत घरे द्या. ज्यांच्यामुळे मुंबई आहे त्यांना इथे हक्काची घरे मिळालीच पाहिजेत, अशी मागणी उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. मुंबईत हक्काचे घर मिळावे यासाठी गिरणी कामगारांच्या १४ संघटनांनी एकत्र येत आज आझाद मैदानावर आंदोलन केले. या आंदोलनात उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे, खासदार अरविंद सावंत, आमदार आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, सचिन अहिर, अजय चौधरी, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड, मनसे नेते बाळा नांदगावकर उपस्थित होते. रात्री उशिरा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीचे आमंत्रण दिल्यानंतर गिरणी कामगारांनी आंदोलन तुर्तास स्थगित केले. उद्या विधानभवनात मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत ही बैठक होणार आहे.

आंदोलनात दुपारी उद्धव ठाकरे म्हणाले की, या गिरणी कामगारांनी महाराष्ट्राच्या चळवळीत मुंबईसाठी रक्त सांडले नसते तर तुम्हाला तुमची खुर्ची दिसू शकली नसती. त्यावेळीही » पान ७ वर

## मुंबईतील ३११ बेकऱ्यांची
## अद्याप स्वच्छ इंधनाकडे पाठ

■ मुंबई

**मुंबईत** लाकूड आणि कोळशाचा वापर करणाऱ्या बेकऱ्यांनी त्यांचे कामकाज गॅस किंवा इतर पर्यावरणपूरक इंधनात रूपांतरित केले आहे की नाही, याची खातरजमा करण्यासाठी उच्च न्यायालयाने आज मुंबई महापालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला वाढीव मुदत दिली. मुंबईतील ३११ बेकऱ्यांनी अद्याप न्यायालयीन आदेशाचे पालन केलेले नाही. या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती मकरंद कर्णिक आणि न्यायमूर्ती नितीन बोरकर यांच्या खंडपीठाने नवीन स्त्रोतांच्या अंमलबजावणीसाठी मुदतवाढ दिली.

### हायकोर्टाने दिली मुदतवाढ

मुंबईतील वायू प्रदूषण पातळी चिंताजनक बनले आहे. याबाबत चिंता व्यक्त करणाऱ्या याचिका न्यायालयात दाखल झाल्या आहेत. त्या याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाच्या विशेष खंडपीठाने अधिकाऱ्यांना सहा महिन्यांत बेकऱ्यांचे कामकाज गॅस वा इतर पर्यावरणपूरक इंधनात रूपांतरित करण्याबाबत पावले उचलण्याचे निर्देश दिले होते.

## मेट्रो स्टेशनवर पाणी शिरल्याने
## कंत्राटदाराला १० लाख रुपयांचा दंड

■ मुंबई

**२६ मे** २०२५ रोजी वरळी येथील आचार्य अत्रे चौक मेट्रो स्टेशन येथे पावसामुळे पाणी शिरल्याची गंभीर घटना घडली. या घटनेमुळे मेट्रो स्टेशनवरील प्रवासी सेवा तत्काळ थांबवावी लागली. या प्रकरणी निष्काळजीपणा आणि नियोजनातील त्रुटी आढळल्याने कंत्राटदार कंपनी डोगस-सोमा यांच्यावर दहा लाख रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. ही माहिती आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी माहिती अधिकारांतर्गत मागविल्यानंतर प्राप्त झाली.

कंत्राटदार कंपनी डोगस-सोमा यांस पाठविलेल्या नोटीस अनुसार २६ मे २०२५ मे रोजी झालेल्या मुसळधार पावसात आचार्य अत्रे चौक मेट्रो स्टेशनच्या कॉन्कोर्स लेव्हलमध्ये पाणी शिरले. ही घटना मुख्यत्वे बी २ एंट्री/एक्झिट इंटरफेसवर बसवलेल्या तात्पुरत्या फायर बॅरियर सिमेंट प्रीकास्ट पॅनेल वॉलमध्ये बिघाड झाल्यामुळे घडली. बॅरियर फुटल्यामुळे पावसाचे पाणी आणि कचरा स्टेशन बॉक्समध्ये प्रवेशला, ज्यामुळे चिखल साचला आणि पाण्याचा प्रवाह प्लॅटफॉर्म, कॉन्कोर्स, अंडर क्रॉफ्ट लेव्हल, एएफसी सिस्टम, सिग्नलिंग, टेलिकॉम, इलेक्ट्रिकल उपकरणे आणि कंट्रोल रूम पर्यंत पोहोचला. या पाण्यामुळे स्टेशनवरील आर्किटेक्चरल डिझाईन/सजावटीचे नुकसान झाले आणि प्रवासी सुविधांवर प्रतिकूल परिणाम झाला. त्यामुळे तत्काळ सेवा बंद करावी लागली.

## न्यू इंडियाच्या भोवन यांना
## अटकपूर्व जामीन मंजूर

■ मुंबई

**न्यू** इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळ्याप्रकरणी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी अभिमन्यू भोवन यांचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने मंजूर केला आहे. भोवन यांचा या घोटाळ्यात सहभाग असल्याचा कोणताही पुरावा समोर आलेला नाही, असे निरीक्षण अतिरिक्त सत्र न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज मंजूर करताना नोंदवले. मात्र भोवन यांना अतिरिक्त सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला असला तरी या प्रकरणाशी संबंधित मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेल्या खटल्यात भोवन हे न्यायालयीन कोठडीतच राहणार आहेत.

## आमदार संजय गायकवाडांची
## कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण

**व्हिडिओ व्हायरल**

■ मुंबई

**शिवसेना** शिंदे गटाचे बुलडाणा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. मुंबईतील आकाशवाणी आमदार निवासातील कॅन्टीनमध्ये टॉवेल व बनियानवर त्यांनी कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमावर व्हायरल झाला आहे. याप्रकरणी आमदार गायकवाड यांना अटक करण्याची मागणी होत आहे. यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गायकवाडा यांना कडक शद्बांत समज दिली असून त्यांचे समर्थन » पान ५ वर

### मुख्यमंत्र्यांकडून पाठराखण नाही

आ. संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण केल्याच्या प्रकरणावरून आज विधान परिषदेत उबाठा आमदार अनिल परब यांनी सरकारला जाब विचारला. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी शिंदेंच्या आमदाराची अजिबात बाजू न घेता त्याच्या वर्तनावर स्पष्ट नाराजी व्यक्त करत कारवाईची भूमिका घेतली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मी व्हिडिओ पाहिला आहे. भाजीला वास येत होता, अन्न खराब होते म्हणून मारहाण करणे योग्य नाही. यावर तक्रार केली असती, तर कारवाई झाली असती. पण लोकप्रतिनिधींनी मारहाण केली. यामुळे सत्तेचा गैरवापर केल्याचा संदेश जातो. अशा घटना आमदारांची प्रतिष्ठा मलीन करतात. विधानसभेचे अध्यक्ष आणि विधानपरिषदेचे सभापती यांनी याबाबत दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी. दोन दिवसांपूर्वीच शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांच्या हॉटेल प्रकरणात फडणवीसांनी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले होते. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे गटाच्या आमदारांची पाठराखण करत नाहीत, अशी राजकीय चर्चा रंगली आहे.

## बीकेसीत ८२९ कोटींच्या भूखंडावर
## एनपीसीआय मुख्यालय उभारणार

■ मुंबई

**नॅशनल** पेमेंट्स् कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) या सरकारी संस्थेने वांद्रे-कुर्ला संकुलातील (बीकेसी) मोक्याच्या स्थळी असलेला भूखंड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) ८२९ कोटी रुपयांमध्ये ८० वर्षांच्या भाडेपट्टीवर घेतला आहे. या भूखंडावर एनपीसीआयचे नवीन मुख्यालय उभारण्यात येणार आहे.

बीकेसीच्या जी ब्लॉकमधील सी-४४ आणि सी-४८ च्या या भूखंडाचे एकत्रित क्षेत्रफळ सुमारे ६ हजार चौरस मीटर एवढे आहे. या भूखंडावर संस्थेला कमाल २४ हजार ७६ चौरस मीटरचे बांधकाम करता येणार आहे. एनपीसीआय या भूखंडावर १६ मजली इमारत उभारणार आहे.

## समीर वानखेडे प्रकरणाची
## ३ महिन्यांत चौकशी करणार

**सीबीआयची हायकोर्टात माहिती**

■ मुंबई

**अभिनेता** शाहरुख खान याचा मुलगा आर्यन खान याला तत्कालीन अंमली पदार्थ विरोधी दलाचे अधिकारी समीर वानखेडे यांनी एका क्रुझवर अटक केल्यानंतर शाहरुख खानकडे लाच मागितल्याचा आरोप करण्यात आला होता. हा आरोप रद्द करण्याची मागणी करणारी याचिका त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती. या प्रकरणी तीन महिन्यांत चौकशी पूर्ण करण्यात येईल, असे सीबीआयच्या वकिलांनी मुंबई उच्च न्यायालयात सांगितले.

समीर वानखेडे यांनी आपल्यावरील आरोप रद्द करण्यासाठी केलेल्या याचिकेवरील सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात न्या. अजय गडकरी व न्या. राजेश पाटील यांच्या पीठासमोर झाली. यावेळी पीठाने सीबीआयला या प्रकरणी चौकशीसाठी इतका वेळ का होत आहे? असा प्रश्न केला. यावर सीबीआयचे वकील कुलदिप पाटील काही उत्तर देत असताना न्यायालयाने म्हटले की, मोघम उत्तर देऊ नका, काहीतरी नेमके सांगा. तुम्हाला या प्रकरणाच्या चौकशीसाठी किती वर्षे पाहिजेत ते स्पष्ट सांगा. त्यावर वकिलांनी या प्रकरणी तीन महिन्यांत चौकशी पूर्ण करणार असल्याचे न्यायालयाला सांगितले. वानखेडे यांचे वकील आबाद फोंडा यांनी सांगितले की, सीबीआय प्रत्येक वेळी महाधिवक्ता तुषार मेहता सुनावणीसाठी येणार असल्याचे कारण सांगून वेळ काढत आहे.

## स्वादुपिंडाच्या कर्करोगावर नवीन औषधाचा शोध

■ मुंबई

**स्वादुपिंड** (पॅन्क्रियाटिक) कर्करोग रोगप्रतिकारक यंत्रणेला कसा चकवा देतो हे जाणून त्यावर नव्या औषधाचे संशोधन डॉ. स्वेथा आनंदन यांनी केले आहे. डॉ. स्वेथा यांनी डॉ. पद्मनी शर्मा आणि नोबेल पारितोषिक विजेते डॉ. जिम ॲलिसन यांच्या मार्गदर्शनाखाली अमेरिकेतील ह्यूस्टन येथील एमडी ॲण्डरसन कॅन्सर सेंटरमध्ये संशोधन करताना त्यांनी हा शोध लावला आहे.

डॉ. स्वेथा आणि त्यांच्या टीमने शोधले की, या कर्करोगाचा ट्युमर आजूबाजूच्या सहायक पेशींना सीएसजी-६ नावाचे प्रोटीन निर्माण करण्यासाठी पुन्हा प्रोग्राम करतो. हे प्रोटीन प्रत्यक्षात रोगप्रतिकारक प्रतिसाद वाढवण्याऐवजी तो बंद करते आणि त्यामुळे कर्करोग एक प्रकारे संरक्षण कवचात लपतो. परंतु जेव्हा सीएसजी-६ रोखणारे औषध पारंपरिक इम्युनोथेरपीसोबत वापरण्यात आले, तेव्हा उंदरांमध्ये चमत्कारिक बदल दिसला. ट्युमर लक्षणीयरित्या कमी झाला आणि रोगप्रतिकारक पेशींनी पुन्हा कर्करोगाशी लढा द्यायला सुरुवात केली. कर्करोग रुग्णांच्या नमुन्यांच्या विश्लेषणातूनही हे क्रांतिकारी संशोधन सिद्ध झाले आहे.



'नेचर हे संशोधन कम्युनिकेशन्स' या जगप्रसिद्ध वैज्ञानिक जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले आहे. या नव्या शक्तिशाली औषधनिर्मितीमुळे या क्षेत्रात मोठी घडामोड होऊ शकते आणि पुढच्या पिढीतील कर्करोग उपचारांच्या विकासाला वेग देऊ शकते. आपल्या नैसर्गिक संरक्षण यंत्रणेवरील अडथळा दूर करून रोगप्रतिकारक यंत्रणा सक्रिय करण्याचा मार्ग दाखवत डॉ. स्वेथा यांचे हे संशोधन पॅन्क्रियाटिक कर्करोगावर मात करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरत आहे.

## उदयपूर फाईल्स प्रदर्शनविरोधी
## याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

■ नवी दिल्ली

**उदयपूरमध्ये** टेलर कन्हैयालाल तेली हत्या प्रकरणावर आधारित उदयपूर फाईल्स या चित्रपटाच्या प्रदर्शनाविरोधातील याचिका आज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. ११ जुलैला प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटाचे प्रदर्शन थांबवण्यासाठी या प्रकरणातील आरोपी मोहम्मद जावेदने याचिका दाखल केली होती. या प्रकरणावर न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने या तातडीने सुनावणीस घेण्यास नकार दिला. यावेळी न्यायालयाने स्पष्ट केले की, ही याचिका १४ जुलैला न्यायालय सुट्टीनंतर पुन्हा सुरू झाल्यानंतर योग्य खंडपीठापुढे मांडावी. तोपर्यंत चित्रपटाचे प्रदर्शन होऊ शकते. कारण चित्रपटातून आक्षेपार्ह दृश्य आणि संवाद वगळले आहेत. याशिवाय या चित्रपटाविरोधात जमियत उलेमा-ए-हिंद या संघटनेनेही स्वतंत्र याचिका दिल्ली उच्च न्यायालयात दाखल केली. ती याचिकाही प्रलंबित आहे.

## चीनच्या निर्यात नकारामुळे भारत
## ऑस्ट्रेलियामधून दुर्मीळ खनिजे घेणार

■ नवी दिल्ली

**भारत**-ऑस्ट्रेलियामधून दुर्मीळ खनिजे घेणार आहे. चीनने या खनिजांच्या निर्यातीवर नियंत्रण आणल्यामुळे भारतात लोहचुंबकांची टंचाई निर्माण झाली आहे. ती दूर करण्यासाठी ऑस्ट्रेलियातील खाणींमधून हे खनिज काढले जाणार आहे, अशी माहिती ऑस्ट्रेलियन अधिकाऱ्यांनी दिली आहे.

भारत व ऑस्ट्रेलियामध्ये याविषयी चर्चा सुरू असून तशा खाणी उपलब्ध असल्याची माहिती न्यू साऊथ वेल्स सरकारच्या आयुक्त मालिनी दत्ता यांनी दिली. या खाणींसाठी भारतातील काही कंपन्यांबरोबर सामंजस्य करार करता येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मालिनी दत्ता यांनी म्हटले की, दुर्मीळ खनिजांबरोबर भारतीय कंपन्यांना तांब्याच्या खाणी घेण्यातही स्वारस्य असून यातील काही कंपन्या यासाठी प्रयत्न करत आहेत. भारतात विजेचा तुटवडा असल्यामुळे अदानींसारख्या कंपन्या या खाणी ताब्यात घेऊन त्यातून तांबे मिळवणार आहेत. या संदर्भात काही कंपन्यांशी बोलणीही सुरू आहेत. अदानीसारख्या काही कंपन्यांनी ऊर्जाक्षेत्रात मोठी गुंतवणूक केली असून, त्यामुळे त्यांनाही तांब्याची गरज आहे. चीनचा जगातील लोहचुंबकाच्या पुरवठ्यात ९० टक्के हिस्सा आहे. हे लोहचुंबक वाहननिर्मिती, घरगुती वापराच्या वस्तू त्याचप्रमाणे हरित ऊर्जेच्या उपकरणांसाठी वापरले जात असते.

## मी हिंदू आहे! कावड यात्रा मार्गावरील
## दुकानांवर फलक! मुस्लीम समाज नाराज

■ बरेली

**हिंदू** महासभेच्या कार्यकर्त्यांनी बरेली येथील कावड मार्गावरील दुकानांवर मी हिंदू आहे! असे फलक लावले आहेत. दुकानदारांच्या आधारकार्डाच्या सहाय्याने त्यांच्या धर्माची ओळख पटवून हे फलक लावण्यात आले आहेत. हा आमच्यावरचा अविश्वास असल्याचे म्हणत मुस्लीम समाजाने या प्रकारावर नाराजी व्यक्त केली आहे.

कावड यात्रा करणाऱ्या कोणत्याही भाविकाचा उपवास दुषित अन्नपदार्थांमुळे तुटू नये यासाठी हे फलक लावण्यात आल्याचे हिंदू महासभेने म्हटले आहे. याआधी उत्तर




प्रदेश सरकारनेही दुकानांच्या बाहेर मालकाचे नाव ठळकपणे लावण्याचा आदेश दिला होता. कावड यात्रेच्या तयारी संदर्भात माहिती देताना पोलीस आयुक्त राजीव खन्ना यांनी म्हटले आहे की, कावड यात्रेवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन तैनात करण्यात आले असून जागोजागी वाहतूक वळवण्यात आली आहे.